**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड**

**सर्व साधारण सभा**

**( दि. २४.३.२०१५ ची तहकुब सभा )**

शुक्रवार दि. २७.३.२०१५ रोजी दुपारी ३.०० वाजता नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेंची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या शंकररावजी चव्हाण सभागृहात भरविण्यात आली होती.

उपस्थिती नोंदणी रजिस्टर मध्ये स्वाक्षरी करुन सदर सभेस खालील म.न.पा. सदस्य उपस्थित होते.

**मा.अ.सत्तार अ. गफुर, महापौर**

**सर्वश्री श्रीमती/**

| | |
|---|---|
| चव्हाण आनंद शंकरराव | कदम गंगाबाई नारायणराव |
| कल्याणकर बालाजी दत्तराव | सातेलीकर श्रीनिवास आशन्ना |
| स्वामी शैजला किशोर | पवळे उमेश देवराव |
| कोकाटे नागाबाई भुजंगराव | कंठेवाड सविता मारोतराव |
| पांढरे स्नेंहा सुधाकर | फारुख अली खा इलियाज खॉ |
| मुंढे शांता मोतीराम | कल्याणकर बालाजी देविदासराव |
| आनेवार गंगासागर संदीप | भवरे किशोर दामोधर |
| प्रमोद मुरलीधराव खेडकर | कनकदंडें मोहिनी महेशराव |
| स.जानी म.कासीम | मोकले सोनाबाई रामचंद्र |
| पोकर्णा नवलकुमार ओमप्रकाश | गुर्रम विनयकुमार जगदिश |
| चव्हाण श्रध्दा सुशिल | गाडीवाले विरेंद्रसिंघ जगतसिंघ |
| उमरेकर अशोक रावण | मुदिराज कमलाबाई रामस्वामी |
| चव्हाण उमेशसिंह अशोकसिंह | रजियाबेगम अयुबखान |
| सलीमा बेगम नुरुल्ला खा | देशमूख वैशाली मिलिंद |
| गायकवाड अंजली सुरेशराव | देशमूख बालासाहेब गंगाधराव |
| स.इतरत फातेम स.मजहुर हुसेन | गफारखान गुलाम महमंद खान |
| अनुजा अमितसिंह तेहरा | शर्मा पुष्पाताई राजेश |
| ज्योती महेंद्र खेडकर | नवाब गुरुमितसिंघ ब-यामसिंघ |
| राओत्रे संगिता पृथ्वीराज | गिल सरजितसिंध पंजाबसिंघ |
| अ.हबीब अ.रहिम बागवान | स.शेर अली स.महेबुब अली |
| कुरेशी चॉदपाशा खाजा | फारुख हुसेन कासिम साब |
| राखेवार सतिष शेषप्पा | कुरेशी शफी अहेमद |
| चाऊस हसीना बेगम साबेर | अ.लतिफ अ.मजीद |
| जकिया बेगम स.मुखतार | गुरुखुर्दे सुंदरलाल किशनलाल |
| खोमणे सुदर्शना महेश | रावत दिपकसिंह काशिनाथसिंह |
| अन्नपुर्णाबाई जम्मुसिंह ठाकूर | गायकवाड वैजयंती भिमराव |
| मोरे संजय गंगाधरराव | अभिषेक सौदे |
| काकडे सिंधू पांडूरंग | देशमूख मंगला गजानन |
| विनय विश्वांभरराव पाटील | जमदाडे करुणा भिमराव |
| कदम विश्वास बालाजी | अड.बन शाम वामनराव |
| अल केसरी हसन बिन उमेद | |

सभेच्या अध्यक्षस्थानी मा. महापौर श्री अ.सत्तार अ,गफूर, हे होते. तसेच श्री सुशील खोडवेकर,आयुक्त, श्री रत्नाकर वाघमारे, उपआयुक्त (प्रशासन), सौ.मिरा कुलकर्णी, मुख्य वैद्याकिय आरोग्याधिकारी, श्री मुख्य लेखा परिक्षक श्री आर.एस.कोलगणे श्री विजय मुंढे, स.आयुक्त आरोग्य, श्री गिरीष कदम, अभियंता, श्री अंधारे, अभियंता व महानगरपालिकेचे सर्व सहायक आयुक्त/क्षेत्रिय अधिकारी व सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते.

सुरवातीस नेहमी प्रमाणे वंदे मातरम हे सामुहिक गित म्हणण्यात आले

**सरजितसिंघ गिल** मा.महापौर आणि सन्माननिय सभागृह यांच्या विनम्रपणे निदर्शनास आणू इच्छितो की, आज दिनांक 27 मार्च 2015 रोजी **चक्रवर्ती सम्राट अशोक बिंदुसार मौर्य** यांची जयंती आहे. ज्या सम्राट अशोकांचे **'धम्मचक्र'** हे भारतीय राष्ट्रध्वजावर विराजमान आहे. आणि त्यांचा **"अशोकस्तंभ"** हा भारत सरकारने **"राजमुद्रा"** म्हणून स्विकारलेला आहे. आणि भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय संविधानात सम्राट अशोकांच्या लोकशाही राज्याचे प्रतिबिंब उमटवलेले आहे. तसेच भारताचे पहीले पंतप्रधान पं.जवाहरलाल

नेहरु सम्राट अशोकाला महान राजा मानत होते म्हणुन त्यांनी सुध्दा जागतीक पातळीवरील भारत सरकारचे धोरण '**पंचशिल**' तत्वांचे स्विकारले, अशा स्रमाट अशोकांचा जन्म **इ.स.पूर्व 304 रोजी चैत्र महिन्यात 'शुक्ल अष्टमी**' या दिवशी झाला. आणि योगायोगाने आपली सर्वसाधारण सभा चैत्र महिन्याच्या शुक्ल अष्टमीला म्हणजेच आज दिनांक 27/03/2015 रोजी होत आहे. त्यामुळे मी सर्व प्रथम चक्रवर्ती सम्राट अशोक यांच्या जयंती निमित्त त्यांच्या तसबीरीला मा.महापौर, उपमहापौर आणि मा.आयुक्त यांच्या शुभहस्ते पुष्प अर्पण करुन स्रमाट अशोकांप्रती आदरांजली वाहुन त्यांची जयंती साजरी करावी, अशी मी या सभागृहास विनंती करतो. तसेच संपूर्ण भारत वर्षात सम्राट अशोकांची जयंती साजरी करण्यासाठी भारत सरकारचे प्रमुख मान्यवर महामहिम राष्ट्रपती प्रणव मुखर्जी, पंतप्रधान मा.ना.नरेंद्रजी मोदी, लोकसभेच्या अध्यक्षा ना.सुमित्रा महाजन, लोकसभेतील कॉग्रेसचे गटनेते मा.श्री मल्लीकार्जुन खरगे आणि महाराष्ट्र राज्याचे लाडके मुख्यमंत्री मा.ना. देवेंद्रजी फडणविस यांना या सभागृहामार्फत शासकीय स्तरावरुन सम्राट अशोकांची जयंती संपुर्ण भारतात साजरी करण्यासाठी विनंती करावी अशी मी या सभागृहास विनंती करतो.

मा.महापौर साहेब आजच्या दै.वृत्तरत्न सम्राट मध्ये माजी न्यायमुर्ती सुरेश घोरपडे यांचा "विश्वधम्म सम्राट अशोक" हा लेख प्रसिध्द झाला. मी त्यांच्याशी भ्रमणध्वनीवरुन संपर्क केला असता, त्यांनी सांगितले की, श्री शांतीस्वरुप बौध्द, नवि दिल्ली यांचे 'सम्यक' प्रकाशना मार्फत सुप्रसिध्द लेखक मधुकर पिपलायन, नवि दिल्ली यांचे प्रसिध्द झालेले पुस्तक '**सम्राट अशोक**' (हिंदी) या पुस्तकाचा संदर्भ घेऊन हा लेख लिहिलेला आहे. या पुस्तकात 'सम्राट अशोक' यांचा जन्म इ.स.पुर्व 304 च्या चैत्र महिन्यातील 'शुक्ल अष्टमी' या दिवशी झाला. अश्या या महान चक्रवर्ती सम्राट अशोकाची जयंती शासकिय स्तरावरुन प्रथमतः भारत वर्षात साजरी करण्याचे भाग्य या महासभेला लाभत आहे. त्यामुळे आपण सर्वजण धन्य आहोत. त्यांच्या प्रती आदारंजली वाहून व त्यांच्या प्रतीमेस पुष्प वाहून या सभागृहाने सम्राट अशोकांची जयंती साजरी करावी तसेच दरवर्षी चैत्र महिन्याच्या शुक्ल आष्टमीला च्रकवर्ती सम्राट अशोकांची जयंती साजरी करावी. अशी कळकळची विनंती मी या सभागृहास करतो.

**दिपकसिंह रावत** श्री सरजितसिंघ गिल यांनी जो प्रस्ताव मांडला त्यास माझे अनुमोदन आहे.

**डॉ.करुणा जमदाडे** श्री सरजितसिंध गिल यांनी महानगरपालिकेमार्फत दरवर्षी जयंती प्रियदर्शी राजा सम्राट अशोक यांची साजरी करण्याचा जो प्रस्ताव मांडला त्याबध्दल त्यांचे अभिनंदन करते. श्री गिल यांनी सुचविल्या प्रमाणे महानगरपालिकेच्या वतीने दरवर्षी सम्राट अशोक राजाची जयंती साजरी करण्यात यावी.

**अशोक उमरेकर** श्री सरजितसिंघ गिल यांनी दरवर्षी महानगरपालिकेचे वतीने सम्राट अशोकाची जयंती साजरी करण्याचा प्रस्ताव मांडला त्यास माझे अनुमोदन आहे. प्रस्ताव एकमताने पास करण्यात यावा. महानगरपालिकेचे मुख्य लेखाधिकारी व नगरसचिव श्री पि.पि.बंकलवाड यांचाही आज वाढ दिवस आहे त्यांनाही वाढदिवसा च्या हार्दीक शुभेच्छा

**महापौर** श्री सरजितसिंघ गिल यांचा प्रस्ताव मंजुर करण्यात येतो.व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र.१७४** **ठ रा व**

स्वातंत्र पूर्व भारतात प्रियदर्शी राजा सम्राट अशोक बिंदूसार मौर्य हा राजा होवून गेलेला असून त्यांनी लोकांना समता,स्वातंत्र आणि बधुता तसेच शांतता व अहिंसेचा उपदेश पोहचविण्यासाठी जागो जागी स्तंभ उभारले व शिलालेख कोरले.प्रजेला सत्य अहिंसा, भुतदया व करुणा ही तत्वे आचरण्यात आणण्याची शिकवण दिली व त्यांच्या काळात शिल्प कला व वास्तुकला विकसित झाली तसेच त्यांनी सारनाथ येथे उभारलेल्या स्मारकातील धर्मचक्र आज भारताच्या राष्ट्रध्वजावर झळकत असून शासनाने अशोकस्तंभ हा राजमुद्रा म्हणून स्विकारलेला आहे. अशा या महानतम चक्रवर्ती राजा सम्राट अशोक बिंदूसार मौर्य यांचा जन्म इ.स.पुर्व ३०४ मध्ये चैत्र महिण्याच्या शुक्ल अष्टमीला म्हणजेच आज दि.२७.३.२०१५ रोजी झालेला आहे, म्हणून ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सम्राट अशोक यांच्या प्रतिमेला पुष्पगुच्छ वाहुन त्यांना विनम्र अभिवादन करते, तसेच दरवर्षी चैत्र महिण्यातील शुक्ल अष्टमीला नांदेड वाधाळा शहर महानगरपालिकेच्या वतीने चक्रवर्ती राजा सम्राट अशोक यांची जयंती साजरी करण्यात यावी असेही ही नामावामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते संमत करते.

तसेच भारत सरकारचे प्रमुख मान्यवर महामहिम राष्ट्रपती श्री प्रणव मुखर्जी ,भारताचे पंतप्रधान मा.ना. श्री नरेंद्रजी मोदी, लोकसभेच्या सभापती मा.ना.सुमित्रा महाजन, लोकसभेतील कॉग्रेसचे नेते मा.श्री मल्लीकार्जून खरगे आणि महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री मा.ना.देवेंद्रजी फडणवीस यांना शासकीय स्तरावरुन चक्रवर्ती राजा सम्राट अशोक बिंदूसार मौर्य यांची जयंती चैत्र महिण्यातील शुक्ल अष्टीमीला दरवर्षी साजरी करण्यासाठी ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते विनंती करते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**अभिषेक सौदे** भारतीय जनता पार्टीचे जेष्ठ नेते व भारताचे माजी पंतप्रधान श्री अटलबिहारी वाजपाई यांना भारताचा भारत रत्न हा सर्वोच्च नागरी पुरस्कार देण्यात आला,त्याबध्दल त्याचे अभिनंदन करण्यात यावे.

**दिपकसिंह रावत** श्री अभिषेक सौदे यांनी माजी पंतप्रधान श्री अटलबिहारी वाजपाई यांना भारत रत्न पुरस्कार मिळाल्याबदल त्याचे अभिनंदनाचा प्रस्ताव मांडला त्यास माझे अनुमोदन आहे.

**अशोक उमरेकर** .केंद्र शासनाने गोवंश हत्या बंदी कायदा अमलात आणला आहे परंतु या गोवंश हत्या कायद्याचे पालन होत नाही. गोवंश हत्याचे उल्लंघन करुन आजही देगलुर नाका भागात काही लोक आपल्या घरात चोरुन गो हत्या करीत आहे त्यांचे विरुण्ध्द कार्यवाही होत नाही.

**विरेद्रसिंध गाडीवाले** केंवळ प्रसिध्दीसाठी स.सदस्य असे मोघम स्वरुपाचे आरोप करीत आहे. स.सदस्यांनी गोवंश हत्या होत असेल तर त्याचे पुरावे आयुक्तांना दिलेले आहे का काही लेखी तक्रार केलेली आहे काय याचा खुलासा करावा.

**महापौर** स.सदस्यांना अशा प्रकारचे प्रश्न सभागृहात उपस्थित करावयाचे असतील तर त्यांनी सभेच्या तीन दिवस अगोदर लेखी प्रश्न द्यावयास पाहिजे.स.सदस्यांनी गोवंश हत्यासंबंधी कोणत्याही प्रकारची तक्रार केलेली नाही. पुराव्या सहीत लेखी तक्रार द्यावी प्रशासनामार्फत संबंधिता विरध्द गुन्हा नोंदवून कायदेशिर कार्यवाही करण्यातयेईल.श्री अटलबिहारी वाजपाई यांना भारत रत्न पुरस्कार मिळाल्याबदल त्यांचे अभिनंदनाचा प्रस्ताव मंजुर करण्यात येतो.

**ठराव क्र. १७५** **ठ रा व**

भारतीय जनता पार्टीचे जेष्ठ नेते व भारताचे माजी पंतप्रधान श्री अटलबिहारी वाजपाई यांना भारताचा सर्वोच्च भारतरत्न नागरी पुरस्कार देशाचे राष्ट्रपती यांच्या हस्ते घरी जावून देण्यात आला त्याबध्दल त्यांचे ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते हार्दीक अभिनदन करते.

**विरेंद्रसिंघ गाडीवाले** स.सदस्यांनी गोंधळ केल्यामूळे मागील सभा तहकुब करावी लागली. मा.महापौरांनी प्रश्नउत्तर संपल्याचे सांगूनही स.सदस्यानी प्रश्नोत्तर चालूच ठेवले.मागील अडीच वर्षापासुन आपण पाहत आहोत की विषय पत्रिका बाजुला ठेवून इतर प्रश्नावर सभागृहात चर्चा करण्यात येत आहे.नियमानुसार सुरवातीचा अर्धातास प्रश्नोत्तराचा राहतो परंतु स. सदस्य तीन चार तास आपल्या प्रभागातील लहान सहान प्रश्न मांडून सभागृहाचा वेळ घालवतात,त्यामूळे सभागृहात शिस्त राहण्याच्या दृष्टीने सभेचे कामकाज कसे चालावे याबाबत मा.महापौरांनी सर्व पक्षाच्या गटनेत्याशी चर्चा करुन सभेच्या कामकाजाची नियमावली तयार करुन पुढच्या सभेत आणावी जेणे करुन या सभागृहाचा मान राखता येईल व सर्व सदस्याना नियमाप्रमाणे आपले प्रश्न मांडून त्यावर उत्तर घेता येईल.

**दिपकसिंह रावत** श्री अजयसिंह बिसेन महापौर असतांना सभेच्या कामकाजाबाबत स.सदस्यांकरीता व अधिकारी व कर्मचा-यांकरीता आचारसंहिता लागू केलेली आहे त्यानुसार सुरवातीचा एक तासाचा वेळ हा स.सदस्यांना प्रश्न मांडण्यासाठी देण्यात यावा असे ठरविण्यात आले होते. परंतु सदरील आचारसंहितेची अमलबजावणी होत नाही. सर्व सदस्यांना या आचारसहितेच्या ठरावाची प्रत देण्यात यावी.सर्वसाधारण सभेस सर्व अधिका-यांनी उपस्थित राहावयास पाहिजे परंतु आजच्या सभेत अनेक अधिकारी अनुपस्थित आहेत. अस्थापना विभागाचे सहायक आयुक्त,बांधकाम विभागाचे अभियंते उपस्थित नाही. आचारसंहितेच्या जो ठराव मंजुर करण्यात आलेला आहे त्याठरावाची अमलबजावणी करण्यात यावी.

**सरजितसिंघ गिल** यापुर्वीच्या कौन्सीलने सभेच्या कामाकाजा संदर्भात स.सदस्य व अधिकारी कर्मचारी यांचेकरीता आचारसंहिता तयार केलेली असून त्यामध्ये काही सुधारणा करावयाची असेल तर महापौरांच्या अध्यक्षतेखाली सर्व पक्षीय सदस्यांची एक उपसमिती कायम करुन त्यामध्ये सुधारणा करावी. तसेच सभागृहाने पारीत केलेल्या ठरावाची अमलबजावणी करण्यासाठी महापौरांच्या अध्यक्षतेखाली सर्व पक्षीय आश्वासन समिती गठित करण्यात आलेली असून या उपसमितीने किमान तीन महिण्यातून एकदा बैठक घेवून ठरावाचा आढावा घ्यावा.

**दिपकसिंह रावत** जिल्हाधिकारी यांनी नविन कत्तलखाना उभारण्याच्या संदर्भात त्रिसदस्यीय समिती नेमली होती या त्रि सदस्य समितीचा अहवाल आलेला आहे तो पुढील सभेत ठेवण्यासाठी संबंधितांना आदेश द्यावेत.

**सरजितसिंध गिल** त्रि सदस्यीय समितीचा अहवाल पुढील सभेत ठेवण्यात यावा.

**महापौर** त्रिसदस्यी समितीचा अहवाल पुढील सर्वसाधारण सभेत ठेवण्यात येईल.

**उमेश चव्हाण** स.सदस्यांना प्रश्न विचारावयाचे असतील स.सदस्यांनी नियमाप्रमाणे तीन दिवस अगोदर लेखी आयुक्तांकडे व महापौरांकडे नगरसचिव विभागाकडे द्यावयाचस पाहिजे. वादग्रस्त विषय असतील तर महापौरांनी असे वादग्रस्त विषय सभागृहापुढे ठेवू नये.

**शफि अहेमद कुरेशी** आयुक्त साहेबांनी रस्त्यावरील अतिक्रमण हटविण्याची मोहिम सुरु केली त्याबदल मी त्यांना धन्यवाद देतो रस्त्यावरील अतिक्रमण काढण्यास आमचा विरोध नाही परंतू अतिक्रमण हटविण्याच्या नावांखाली गरीब हातगाडेधारकावर व्यापा-यावर बदसलुकी गैरवर्तन करण्यात येत आहे. रस्त्यावर त्यांचे अंतिक्रमण नसतांनाही त्याचे दुकानाचे दोनदोन फुटाचे बांधकाम पाडलेले आहे. नालीचे आंत आमच्या जागेवर

बांधकाम असल्यामूळे ते पाडण्यात येवू नये अशी विनंती केली परंतु त्यांची विनंती धुडकावुन दुकानाचे बांधकाम पाडले नियमाचे उंल्लघन करुन गोंरगरीब व्यापा-यावर दादागिरी करुन त्याचे नुकसान करण्यात येत आहे.शहरात विना परवानगी ने मुख्य रस्त्याच्या बाजूने मोठया प्रमाणात फॅलटचे, व्यापारी संकुलाचे बांधकाम होत आहे. त्याविरुध्द कोणत्याच प्रकारची कार्यवाही करण्यात येत नाही आयुक्त साहेबांनी प्रथम विना परवानगीने होत असलेल्या फॅलटधारका विरुध्द, शॉपिंग कॉम्प्लेच्या विरुध्द कार्यवाही करावी.अतिक्रमणाच्या नावाखाली गोरगरीबाचे संसार उधडयावर पाडू नये.

**स.शेर अली** रस्ता रुंदीकरणासाठी नागरीकांनी स्वतःहून आपल्या जागा दिलेल्या आहेत.२०-२० फुटाचा रस्ता असतांना त्यापेक्षा अधिक रुंदीत येत असलेले नागरीकाचे दोन दोन फुटांच्या भिंती पाडल्या.गरीब नागरीकांवर दादागिरी करण्यात येत आहे. अतिक्रमण काढण्यास कोणताही सदस्य विरोध करणार नाही परंतु अतिक्रमण काढीत असतांना नागरीकांचे व्यापा-याचे नुकसान होणार नाही याची खबरदारी प्रशासनाने घ्यावी. चौकातील अतिक्रमण म्हणून भिंत पाडत असतांना एका नागरीकास इजा होवून त्यांचा हात फॅक्चर झाला आहे त्यास नुकसान भरपाई देण्यात यावी.

**सरजितसिंध गिल** गुरुव्दारा यात्रेकरुंच्या सुविधेसाठी गुरुव्दारा गेट नं.१ ते नगिनाघाट या रस्त्याचे रुंदीकरण करण्यात आले परंतु या रस्त्यावर मोठया प्रमाणात अतिक्रमण झालेले आहे ते अतिक्रमण का काढण्यात येत नाही .

**बाळासाहेब कल्याणकर** आमच्या प्रभागात मुख्य रस्त्यावर विना परवानगीने मटनाच्या दुकाना चालू असून त्यांचे विरुध्द कार्यवाही का करण्यात येत नाही याचा खुलासा करण्यात यावा.

**अनुजा तेहरा** या सभागृहात ५० टक्के महिला सदस्य निवडून आलेल्या असून महिलांना सभागृहात बोलू देत नाही.महिला सदस्यांनाही सभागृहात पुरुष सदस्यांप्रमाणे बोलण्याचा अधिकार आहे, महापौर व आयुक्त साहेबाना विनंती आहे की.महिला सदस्यांनाही सभागृहात बोलण्याची संधी द्यावी. त्यांना बोलण्याची संधी देण्यात येत नसेल तर आम्ही महिला सदस्या त्याचा निषेध करुन सभात्याग करु याची नोंद घेण्यात यावी.

**सुदर्शना खोमणे** सौ.तेहरा मॅडम यांनी जी सुचना केली त्यास सर्व महिला सदस्यांचा पाठिंबा आहे. महिला सदस्यांना बोलण्याची संधी द्यावी.

**विरेंद्रसिंध गाडीवाले** श्री शफि अहेमद यांनी अत्यंत चांगली सुचना केली .प्रशासनास शहरातील मुख्य रस्त्यावरील अतिक्रमण काढण्यास आमचे सर्व सहकार्य राहील परंतु अतिक्रमण हटविण्याच्या नावाखाली गोरगरीबांवर अन्याय होणार नाही याची दक्षता प्रशासनाने घ्यावी. शहरातील सर्व मुख्य रस्त्यावरील अतिक्रमणाचे ऍसेसमेंट करण्यात यावे. श्री गिल साहेबानीही गुरुव्दारा गेट नं.१ ते नगिनाघाट या रस्त्यावरील अतिक्रमण हटविण्याची मागणी केली आहे.याकडे लक्ष देण्यात यावे.

**महापौर** देगलुर नाका भागातील अतिक्रमण काढीत असतांना गरीब दुकानदाराचे अतिक्रमण काढण्यात आले हे अत्यंत चुकीचे काम करण्यात आले. अतिक्रमण काढण्यास आमचा विरोध नाही या कामास आमचे सर्वाचे सहकार्य राहील व्यापा-यानी आपल्या दुकाना समोरील जागेत फुटपाथ चांगले रहावे म्हणून फरशी टाकली होती परंतु ती तोडण्यात आली. श्री गिल यांनी गुरुव्दारा गेट नं.१ ते नगिनाघाट या रस्त्यावरील अतिक्रमण हटविण्याची मागणी केली त्यारस्त्यावरील अतिक्रमण का काढण्यात येत नाही. डॉक्टर लाईन मध्ये ही मोठया प्रमाणात अतिक्रमण आहेत त्यांचे विरुध्द ही गुन्हे नोंदवून कार्यवाही करावी .धार्मीक स्थळास जाणा-यारस्त्यावरील सर्व अतिक्रमण काढण्यात यावे.क्षेत्रिय कार्यालय निहाय अतिक्रमण हटविण्याचा प्रोग्राम तयार करुन अतिक्रमण काढण्याची कार्यवाही करण्यात यावी.

**दिपकसिंह रावत** रस्त्यावरील अतिक्रमण हटविण्यास सर्व सदस्यांनी पाठींबा दिलेला आहे. आमच्याही प्रभागातील जुन्या मोंढयातील अतिक्रमण काढण्यात आलेले आहे जून्या मोंढा भागात दुकानासमोर ओपन स्पेस असल्यामूळे व्यापा-यानी तेथे फरशी टाकून जागेचे सुशोभिकरण केले तेही तोडून टाकलेले आहे. विद्यानगर हौ.सोसा.ची जागा ही महानगरपालिकेच्या मालकीची असून याप्रकरणात महानगरपालिकेच्या बाजूने निकाल लागलेला आहे असे असतांना स्थायी समितीने जागेच्या संदर्भात वाटाघाटी करण्याचे अधिकार आयुक्तांना देण्यात आलेले आहे. जे बेकायदेशिर आहे. स्थायी समितीचा ठराव विखंडीत करण्यासाठी शासनास सादर करण्यात यावा.

**स.जानी** रस्त्यावरील अतिक्रमण हटविण्याची मोहिम सुरु करण्यात आलेली आहे .रस्त्यावरील अतिकमण हटवित असतांना रस्ता किती फुटाचा आहे याचे मेजरमेंट घेवूनच रस्त्यावरील अतिक्रमण हटवावयास पाहिजे. असे अंदाजपंचे अतिक्रमण हटविल्यामूळे गोरगरीब व्यापा-यावर अन्याय होत आहे. मुथा चौक ते रिजनल वर्कशॉप पर्यत रस्त्याचे रुंदीकरण करण्यात आले परंतु या रस्त्याच्या मधोमध बांधण्यात आलेल्या रोड डिव्हायडर मूळे रस्त्याच्या दोन्ही बाजुने फक्त एकच वाहन पास होते यामूळे वाहतुकीस अडथळा निर्माण होतो त्यामूळे रस्त्यामधील रोड डिव्हायडर तोडण्यात यावे जेणे करुन रस्ता रुंद होवून वाहतुकीस अडथळा

निर्माण होणार नाही. व्यापा-याचे दुकानासमोरील ठेवलेले साहित्य ,बोर्ड उचलून नेण्यात येत आहे. प्रशासन व्यापा-यांना ब्लक मेल करीत असुन जे व्यापारी पैसे देतात त्याचे विरुध्द कार्यवाही करीत नाही जे पैसे देत नाही त्याचे साहित्य जप्त करण्यात येत आहे. श्री शफी अहेमद कुरेशी यांनी अतिषय चांगली सुचना केलेली आहे. गोरगरीब व्यापा-यांना विनाकारण वेठीस धरण्यात येत आहे त्यांचे जे नुकसान झाले त्याची भरपाई करण्यात यावी.

**डॉ.करुणा जमदाडे** हार्डशिप योजने अंतर्गत अनाधिकृत बांधकामे नियमित करण्यास मान्य्ता देण्यात आलेली आहे. त्यानुसार हडको बसस्टॉप जवळील दिपांजली जनरल व मेडीकल दुकानधारकानी आपली इमारत हार्डशिप प्रिमियम अंतर्गत नियमित करण्यासाठी तीन वर्षापुर्वी संचिंका संबंधित विभागास सादर केलेली आहे.परतु अद्याप त्यांची संचिका निकाली काढण्यात आलेली नाही. नियमानुसार ते हार्डशिप प्रिमियमचे पैसे भरण्यास तयार आहे विनाकारण दहशत निर्माण करुन पैश्याची मागणी करण्यात येत आहे. ही इमारत पाडण्यासाठी महानगरपालिकेसमोर उपोषण ही करण्यात आलेले आहे. आयुक्तांनी याकडे लक्ष देवून संचिका निकाली काढावी.

**रजिया बेगम** लहान सहान दुकान दाराचे दुकानासमोरील लावण्यात आलेले विविध प्रकारचे साहित्य प्लॉस्टीकचे सामान महानगरपालिकेचे कर्मचारी घेवून गेलेले आहेत आयुक्तांना विनंती आहे की संबंधिताचे सर्व साहित्य परत करावे.

**प्रमोद खेडकर** शहरात पाण्याची टंचाई जाणवत आहे शहरातील एकूण किती हातपंम्प बंद आहेत त्यापैकी किती दुरुस्त करण्यात आले याची माहिती देण्यात यावी.

**बालाजी कल्याणकर** महानगरपालिकेचे एकूण ७०० बोअर आहेत सर्व्हे मध्ये फक्त ४०० बोअर असल्याचे रेकॉर्डवर आहेत ३०० बोअर कुठे गेले याचा खुलासा करण्यात यावा.

**आयुक्त** तत्कालिन नांदेड नगरपालिका ही १९५२ पासुन अस्तित्वात आली त्यानंतर मार्च १९९७ ला नांदेड व वाघाळा नगरपालिकेचे एकत्रि करण होवून नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका अस्तित्वात आली. या कालावधीत विविध शासनाचे योजने अंतर्गत अनेक रस्त्याचे रुंदीकरण करण्यात आले काही मोकळया जागेत इमारतीचे बांधकाम करण्यात आले,इतर कारणासाठी जागेचा विकास करण्यात आला असल्यामूळे या जागेवरील विंधन विहिरी बंद झालेल्या आहेत.तर काही नागरीकांनी महानगरपालिकेच्या विंधन विहीरी कम्पाउंड वॉलमध्ये घेतल्याचे निदर्शनास आलेले आहे.

**विषय क्र.१**

दि.२६.६.२०१४, दि.१९.७.२०१४ रोजी सकाळी ११.00 व दुपारी १.00 वा., दिनांक २४.७.२०१४ रोजी दुपारी ३.०० वा., दि. १४.८.२०१४ दु.3.00 (अंदाजपत्रकिय विशेष सभा) व साय. ५.०० वा. (सर्वसाधारण सभा), दि. २४.११.२०१४, व दि. ९.१.२०१५ रोजी झालेल्या मागील सभेच्या इतिवृत्तास कायम करणे बाबत.

**विरेंद्रसिघ गाडीवाले** दि.२४.११.२०१४ च्या सभेत कै.बानो एज्युकेशन संस्थेला मौजे नादेड येथील सर्व्हे नं.१६९ पैकी ८० आर जमिन देण्याचा प्रस्ताव परत घेतला होता परंतु इतिवृत्तात सदरचा ठराव मंजुर केल्याचे दिसून येते .करीता सदरचा प्रस्ताव मी परत घेतलेला असल्यामूळे ठराव क्र.१२४ हा रध्द करण्यात यावा व तशी दुरुस्ती दि.२४.११.२०१४च्या सभेच्या इतिवृत्तात करण्यात यावी.

**दिपकसिंहि रावत** दि.१४.८.२०१४ रोजीच्या सभेत पंन्धे कंपनीला व्याज माफ करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. या निर्णयास शिवसेना व भाजप सदस्यांचा विरोध होता कारण प्रस्तावात बिएसयुपीच्या कामासाठी एलऍण्डटी ची निविदा मंजुर करण्यात आली असतांना पंन्धे कंपनीचे व्याज माफ करण्याचा निर्णय घेण्यात आला,व्याज माफी मुळे महानगरपालिकेचे रु.३.५७ कोटीचे नुकसान होत आहे.

**विरेद्रसिंध गाडीवाले** हा प्रस्ताव सभागृहात चर्चेस आला तेव्हा या प्रस्तावावर ज्यांनी ज्यांनी आपली मते मांडली,विरोध केला ते सर्व इतिवृत्तांत आलेले आहे. श्री अशोक उमरेकर व इतर दोन तीन सदस्यांनी विरोध केलेला आहे त्यामूळे बहुमताने निर्णय घेण्यात आला.इतर कोणत्याही सदस्यांनी या विषयावर चर्चा केलेली नाही, बोलले नाही. त्यावेळी ज्यांनी विरोध केलेला आहे ते इतिवृत्तात आलेले आहे.

**उमेश चव्हाण** या विषयावर मला बोलावयाचे आहे

**सरजितसिंध गिल** मागील सभेत जे सदस्य उपस्थित होते त्याच सदस्यांना मागील सभेच्या इतिवृत्तावर बोलण्याचा अधिकार आहे.

**स.शेर अली** दि.९.१.२०१५ रोजी झालेल्या सभेत ठराव क्र.१६० अन्वये शहरातील रस्त्यांना चौकाना नाव देण्यास मान्यता देण्यात आलेली आहे यामध्ये अ.क्र.२५ प्रभाग क्र.१२ अनुसया निवास जाधव याचे घर ते आवड निलमय अर्पाटमेट पर्यतच्या रस्त्यास कै.रामराव दशरथ जाधव असे मार्ग देण्यास मान्यता देण्यात आलेली आहे

परंतु ज्या जागेत सदरचा रस्ता करण्यात आलेला आहे ती जागा धार्मीक वक्फ बोर्डाची इनामी जागा असून या जागेच्या मालकी हक्का बाबत प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.नियमानुसार महानगरपालिकेच्या मालकीच्या रस्त्याना नाव देता येते.करीता प्रभाग क्र.१२ अनुसया निवास जाधव याचे घर ते आवड निलमय अर्पाटमेट पर्यतच्या रस्त्यास कै.रामराव दशरथ जाधव असे नांव देण्याचा ठराव रध्द करण्यात यावा.

**महापौर** कै.बानो एज्युकेशन संस्थेला मौजे नादेड येथील सर्व्हे नं.१६९ पैकी ८० आर जमिन देण्याचा निर्णय हा सभागृहाचे मान्यतेने घेण्यात आलेला आहे.

**सुदर्शना खोमणे** दि.१९.२.२०१४ च्या सभेत दै.प्रजावाणीचे मुख्य संपादक कै.सुधाकररावजी डोईफोडे यांचे स्मृतीप्रित्यर्थ त्याचे नांव महानगरपालिकेच्या रस्त्याला किंवा इमारतीला नाव देण्यासाठी उपसमिती कायम करुन (८) दिवसात निर्णय घेण्यात येईल असे महापौरांनी आश्वासन दिले होते परंतु अद्याप निर्णय घेण्यात आलेला नाही.

**महापौर** नाना नानी पार्क मध्ये जेष्ठ नागरीकांकरीता बांधण्यात आलेल्या भवनास कै.सुधाकररावजी डोईफोडे असे नामकरणास त्यांचे मुलाने पत्र दिलेले आहे. लवकरच त्याबाबत निर्णय धेण्यात येइल.

**फारुख अली खॉ** मागील ८ सभेचे इतिवृत्तास कायम करण्याचा विषय आलेला आहे. ८ सभेच्या इतिवृत्तास कायम करता येते काय याबाबत नगरसचिवांनी खुलासा करावा.

**नगरसचिव** सभेसमोर मांडण्यात आलेल्य विषयावर निर्णय घेण्याचा अधिकार सभागृहाला आहे.

**फारुख अली खॉ** दि.१४.८.२०१४ च्यासभेत पन्धे कंपनीला देण्यात आलेल्या अग्रीम रक्कमेचे व्याज माफ करण्याचा निर्णय घेण्यात आला,परंतु विषय पत्रिकेवर एलएण्डटी ला देण्यात आलेल्या अग्रीम रक्कमेवर व्याजाबाबत निर्णय घेण्यासाठी आयुक्तांचा प्रस्ताव होता.त्यानंतर ठरावात एलएण्डटी/ पंन्धे इन्फ्रा .कंपनी अशी दुरुस्ती करण्यात आली. म्हणजे एका कामासाठी दोन कंत्राटदाराना कामाचे आदेश देण्यात आले होते काय हे दोन्ही कंपन्या नोंदणी कृत कंत्राटदार आहेत. कोणत्या कंपनीला घराचे बांधकाम देण्यात आले व कोणत्या कंपनीचे व्याज माफ करण्याचा निर्णय घेण्यात आला याचा खुलासा करण्यात यावा.

**महापौर** एलऍण्डटी ला घराचे बांधकामासाठी कामाचे आदेश देण्यात आले होते परंतु या कंपनीने नंतर पन्धे कंपनीस सबलेट केलेले आहे.आयुक्तांकडून अग्रीम रक्कमेचे व्याजा बाबत निर्णय घेण्यासाठी प्रस्ताव आला होता. याप्रस्तावावर सभागृहाने बहुमताने निर्णय धेतलेला आहे. सर्वसाधारण सभेस आयुक्तांचे प्रस्तावावर निर्णय धेण्याचा अधिकार आहे.

**संजय मोरे** जागा ताब्यात नसतांना संबंधित कंत्राटदारास कामाचे आदेश कसे काय देण्यात आले. अग्रीम रक्कम कशी काय देण्यात आली याचा खुलासा करण्यात यावा.

**सरजितसिंघ गिल** ठरावामध्ये टंकलेखनाची काही चुक झालेली आहे काय काना मात्रा विलांटी चुक झाली आहे काय ते सांगावे ती दुरुस्ती करता येईल.

**गफार खान** आयुक्तांनी नियमानुसार पुढील वैधानिक कार्यवाही करावी असे ठरावात नमूद आहे त्यामूळे आयुक्त सदरच्या ठरावावर नियमानुसार पुढील वैधानिक कार्यवाही करतील. याविषयावर वारंवार चर्चा करण्यात येवू नये.

**महापौर** दि.२६.६.२०१४, दि.१९.७.२०१४ रोजी सकाळी ११.00 व दुपारी १.00 वा., दिनांक २४.७.२०१४ रोजी दुपारी ३.०० वा., दि.१४.८.२०१४ दु.3.00 (अंदाजपत्रकिय विशेष सभा) व साय.५.०० वा. (सर्वसाधारण सभा), दि.२४.११.२०१४ रोजी झालेल्या मागील सभेच्या इतिवृत्तास कायम करण्यास मान्यता देण्यात येते. श्री स.शेर अली यांनी सुचविलेल्या दुरुस्ती प्रमाणे दि.९.१.२०१४ रोजी झालेल्या सभेतील ठराव क्र.१६० मधील अ.क्र. २५ प्रभाग क्र.१२ अनुसया निवास जाधव याचे घर ते आवड निलमय अर्पाटमेट पर्यतच्या रस्त्यास कै.रामराव दशरथ जाधव असे मार्ग देण्यास मान्यता देण्याचा ठराव रध्द करण्यात येतो.तसेच स.सदस्य श्री गणपत धबाळे यांनी दै.समता दर्पन वर्तमानपत्राचे कार्यालय ते देगांवचाळ भिमघाट या मार्गास स्वातंत्र सैनिक प्रभाकरराव सताजीराव हिंगोले याचे नाव देण्याचा प्रस्ताव सादर केलेला असून तो चुकीने राहिलेला आहे सदरचा प्रस्ताव मंजुर करुन तशी दुरुस्ती ठराव क्र.१६० मध्ये करण्यास मान्यता देवून दि.९.१.२०१५ रोजी झालेल्या मागील सभेच्या इतिवृत्तास कायम करण्यास मान्यता देण्यात येते.

**ठराव क्र.१७६** **ठ रा व**

दि.२६.६.२०१४, दि.१९.७.२०१४ रोजी सकाळी ११.00 व दुपारी १.00 वा., दिनांक २४.७.२०१४ रोजी दुपारी ३.०० वा., दि.१४.८.२०१४ दु.3.00 (अंदाजपत्रकिय विशेष सभा) व साय.५.०० वा. (सर्वसाधारण सभा), दि.२४.११.२०१४ रोजी झालेल्या मागील सभेच्या इतिवृत्तास कायम करण्यास ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देण्यात येते

दि.९.१.२०१५ रोजी झालेल्या सभेतील ठराव क्र.१६० मधील अ.क्र. २५ प्रभाग क्र.१२ अनुसया निवास जाधव याचे घर ते आवड निलमय अर्पाटमेट पर्यतच्या रस्त्यास कै.रामराव दशरथ जाधव मार्ग असे नामकरण करण्यास मान्यता देण्याचा निर्णय रध्द करुन सदर ठरावातून अ.क्र.२५ वगळण्यास तसेच दै.समता दर्पन वर्तमानपत्राचे कार्यालय ते देगांवचाळ भिमघाट या मार्गास स्वातंत्र सैनिक **प्रभाकरराव सताजीराव हिंगोले** याचे नाव देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात येते अशी दुरुस्ती ठराव क्र.१६० मध्ये करण्यास मान्यता

देवून दि.९.१.२०१५ रोजी झालेल्या मागील सभेच्या इतिवृत्तास कायम करण्यास ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देण्यात येते.

**विषय क्र.२**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हध्दीतील मुला मुंलीचे गुणोत्तर-२०१५ प्रमाणाची नोंद घेणे बाबत.

| अ.क्र. | महिणा | एकूण जन्म | | एकूण | लिंग गुणोत्तर प्रतिहजार मुलीचे प्रमाणे |
|---|---|---|---|---|---|
| | | पुरुष | स्त्री | | |
| १. | डिसेंबर | १४१० | १२८० | २६९० | ९०७.८० |
| २ | जानेवारी | १३११ | ११८८ | २४९९ | ९०६.१७ |
| ३ | फेब्रूवारी | १००४ | ९४१ | १९४५ | ९३७.२५ |

**महापौर** नोंद घेण्यात येते.

**ठराव क्र.१७७** **ठ रा व**

खालील प्रमाणे प्राप्त झालेल्या नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हध्दीतील मुला मुंलीचे गुणोत्तर-२०१५ प्रमाणाची नोंद ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते घेते.

| अ.क्र. | महिणा | एकूण जन्म | | एकूण | लिंग गुणोत्तर प्रतिहजार मुलीचे प्रमाणे |
|---|---|---|---|---|---|
| | | पुरुष | स्त्री | | |
| १. | डिसेंबर | १४१० | १२८० | २६९० | ९०७.८० |
| २ | जानेवारी | १३११ | ११८८ | २४९९ | ९०६.१७ |
| ३ | फेब्रूवारी | १००४ | ९४१ | १९४५ | ९३७.२५ |

**विषय क्र.३**

महाराष्ट्र शासन निर्णय क्र.निमवा-२०१४/प्र.क्र.८३/सेवा-९ दि.२१ ऑगस्ट २०१४ व शासन निर्णय क्र.निमवा-१११४/प्र.क्र.१९/सेवा-९ दि.२० सप्टेंबर २०१४ नुसार का.आदेश क्र.नांवाशमनपा/लेवी/सेनि/२१११७/२०१५दि.२७.२.२०१५ अन्वये मनपा असुधारीत वेतनश्रेणीतील निवृत्तीवेतनधारक/ कुटुंब निवृत्ती वेतनधारक यांचे मुळ निवत्ती वेतनावर दि.१.१.२०१४ पासून महा.भत्ता १८३ टक्केवरुन २०० टक्के या दराने रोखीने प्रदान करण्याची प्रशासकीय व आर्थिक मान्यता प्रदान करण्यात आली त्यास कार्योत्तर प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे बाबत

**महापौर** कार्योत्तर मान्यता देण्यात येते.

**ठराव क्र.१७८** **ठ रा व**

महाराष्ट्र शासन निर्णय क्र.निमवा-२०१४/प्र.क्र.८३/सेवा-९ दि.२१ ऑगस्ट २०१४ व शासन निर्णय क्र.निमवा-१११४/प्र.क्र.१९/सेवा-९ दि.२० सप्टेंबर २०१४ नुसार का.आदेश क्र.नांवाशमनपा/लेवी/सेनि/२१११७/२०१५दि.२७.२.२०१५ अन्वये मनपा असुधारीत वेतनश्रेणीतील निवृत्तीवेतनधारक/ कुटुंब निवृत्ती वेतनधारक यांचे मुळ निवत्ती वेतनावर दि.१.१.२०१४ पासून महा.भत्ता १८३ टक्केवरुन २०० टक्के या

दराने रोखीने प्रदान करण्याची प्रशासकीय व आर्थिक मान्यता प्रदान करण्यात आली त्यास कार्योत्तर प्रशासकीय व आर्थिक मान्यता ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते देते.

**विषय क्र.४**

महाराष्ट्र शासन निर्णय क्र.मभवा-१११४/प्र.क्र.२८/सेवा-९ दि.७ फेब्रूवारी २०१५ नुसार का.आदेश क्र.नांवाशमनपा/लेवी/वेतन/२०३७७/ २०१५अन्वये नावामनपाकेतील कर्मचा-यांना दि.१.२.२०१५ पासून मूळ वेतन व ग्रेडवेतन यावर १०७ टक्के महागाई भत्ता लागू करण्यात आला त्यास कार्योत्तर प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे बाबत

**महापौर** कार्योत्तर मान्यता देण्यात येते.

**ठराव क्र.१७९** **ठ रा व**

महाराष्ट्र शासन निर्णय क्र.मभवा-१११४/प्र.क्र.२८/सेवा-९ दि.७ फेब्रूवारी २०१५ नुसार का.आदेश क्र.नांवाशमनपा/लेवी/वेतन/२०३७७/ २०१५अन्वये नावामनपाकेतील कर्मचा-यांना दि.१.२.२०१५ पासून मूळ वेतन व ग्रेडवेतन यावर १०७ टक्के महागाई भत्ता लागू करण्यात आला त्यास कार्योत्तर प्रशासकीय व आर्थिक मान्यता ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते देते.

**विषय क्र.५**

महाराष्ट्र शासन निर्णय क्र.निमवा-२०१५/प्र.क्र.१८/सेवा-४ दि.१२.२.२०१४ नुसार का.आदेश क्र.नांवाशमनपा/ लेवी/सेनि/२१११७/ २०१५दि.२७.२.२०१५ अन्वये मनपा निवृत्तीवेतनधारक/कुटुंब निवृत्ती वेतनधारक यांचे मुळ निवत्ती वेतनावर दि. १.२.२०१५ पासून महा.भत्ता १०० टक्केवरुन १०७ टक्के या दराने रोखीने प्रदान करण्याची प्रशासकीय व आर्थिक मान्यता प्रदान करण्यात आली त्यास कार्योत्तर प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे बाबत

**महापौर** कार्योत्तर प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येते.

**ठराव क्र.१८०** **ठ रा व**

महाराष्ट्र शासन निर्णय क्र.निमवा-२०१५/प्र.क्र.१८/सेवा-४ दि.१२.२.२०१४ नुसार का.आदेश क्र.नांवाशमनपा/ लेवी/सेनि/२१११७/ २०१५दि.२७.२.२०१५ अन्वये मनपा निवृत्तीवेतनधारक/कुटुंब निवृत्ती वेतनधारक यांचे मुळ निवत्ती वेतनावर दि. १.२.२०१५ पासून महा.भत्ता १०० टक्केवरुन १०७ टक्के या दराने रोखीने प्रदान करण्याची प्रशासकीय व आर्थिक मान्यता प्रदान करण्यात आली त्यास कार्योत्तर प्रशासकीय व आर्थिक मान्यता ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते देते.

**विषय क्र.६**

नांवामनपा सर्वसाधारण सभा ठराव क्र. ३७ दि.१९.७.२०१४ नुसार इमारतीचे बाजूने सोडावयाचे समास अंतरात १०० टक्के शिथिलकरणाचा प्रस्ताव मंजुर झालेला आहे.त्यामूळे शहरात नव्याने होणारी बाधकामे सुध्दा १०० टक्के समासअंतर शिथिलीकरण असल्यामूळे समास अंतरे न सोडता सर्रास बांधकामे करीत आहेत. त्यामूळे नैसर्गिक वायुविजन ( व्हेन्टीलेशन) सुर्य प्रकाश इमारतीतल्या लोकांना भेणार नाही त्यामूळे जनतेच्या आरोग्यास धोका निर्माण होवू शकतो. एखादी आगीसारखी दुर्घटना घडल्यास सर्व इमारतींना इजा पोहचू शकते.

त्याअनुषंगाने वरील प्रमाणेचा पारीत केलेला ठराव सन १ सप्टेंबर २०१२ पुर्वीच्या इमारतींना लागू करावा व तदनंतरच्या इमारतीस सर्व बाजूने समास अतरास ५० टक्के पर्यतच सवलत असावी व त्याचे दर उपरोक्त ठरावानुसार असावे.जेणे करुन नागरीकाचे सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होणार नाही व विकास नियंत्रण नियमावलीनुसार परवानगी देण्यास सुलभता होईल.त्या अनुंषंगाने प्रस्ताव मान्यतेस्वव सादर.

**विरेद्रसिंध गाडीवाले** महानगरपालिकेने घेतलेल्या निर्णयानुसार आजपर्यत नागरीकांनी सवलतीचा फायदा घेतलेला आहे त्यामूळे मागील तारखेपासून प्रस्तावित निर्णय लागू केल्यास नागरीकांवर अन्याय होइल त्यामूळे आजच्या तारखेपर्यतच्या झालेल्या इमारतींना प्रस्तावित निर्णय लागू राहणार नाही. आजच्या तारखेपासुन पुढील होणा-या इमारतीना प्रस्तावित निर्णय लागू करण्यात यावा व तशी प्रस्तावात दुरुस्ती करण्यात यावी.

**दिपकसिंह रावत** सभागृह नेत्यानी जी सुचना केलेली आहे ती बरोबर आहे. नागरीकाचे कोणत्याही प्रकारचे नुकसान होणार नाही अशा पध्दतीने निर्णय घेण्यात यावा.

**स.शेर अली** किती नागरीकांना बांधकाम परवानगी देण्यात आल्या त्यापैकी किती नागरीकांनी बांधकाम कम्पलीशन प्रमाणपत्र घेतले याचे काही रेकॉर्ड आहे काय

**आयुक्त** स.सदस्यांनी सुचविल्याप्रमाणे आजच्या तारेखपासुन निर्णय धेण्यात यावा.

**महापौर** स.सदस्यांनी सुचविलेल्या दुरुस्ती प्रमाणे प्रस्तावास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतों

**ठराव क्र.१८१** **ठ रा व**

नांवामनपा सर्वसाधारण सभा ठराव क्र. ३७ दि.१९.७.२०१४ नुसार इमारतीचे बाजूने सोडावयाचे समास अंतरात १०० टक्के शिथिलकरणाचा प्रस्ताव मंजुर झालेला आहे.त्यामूळे शहरात नव्याने होणारी बाधकामे सुध्दा १०० टक्के समासअंतर शिथिलीकरण असल्यामूळे समास अंतरे न सोडता सर्रास बांधकामे करीत आहेत. त्यामूळे नैसर्गिक वायुविजन ( व्हेन्टीलेशन) सुर्य प्रकाश इमारतीतल्या

लोकांना भेणार नाही त्यामूळे जनतेच्या आरोग्यास धोका निर्माण होवू शकतो. एखादी आगीसारखी दुर्घटना घडल्यास सर्व इमारतींना इजा पोहचू शकते.

करीता नांवामनपा सर्वसाधारण सभा ठराव क्र. ३७ दि.१९.७.२०१४ मधील नियम हा दि.२७.३.२०१५ पुर्वीच्या इमारतींना सवलतीचा नियम राहील व तदनंतरच्या इमारतीस सामासिक अंतरास खालील प्रमाणे सुट देवून नियमित करण्यास ही नांवामनपा सर्वसाधारणसभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

| अ. क्र. | प्लॉट चे क्षेत्र | पुढील बाजू | | बाजू 1 | बाजू 2 | मागील बाजू |
|---|---|---|---|---|---|---|
| | | रहिवास वापर | वाणिज्य वापर | | | |
| 1 | 125 चौ. मी. | 50 % | 0 | 50 % | 50% | 50% |
| | किंवा | 50 % | 0 | 100 % | 0 | 50 % |
| | किंवा | 0 | 0 | 50 % | 50 % | 100 % |
| 2 | 125 ते 150 चौ. मी. | 50 % | 0 | 50 % | 50 % | 50 % |
| 3 | 150 ते 250 चौ. मी. (up to two tenements) | 30 % | 0 | 50 % | 50 % | 50 % |
| | 150 ते 250 चौ. मी. (more than 2 & maximum 4 tenements) | 0 | 0 | 30 % | 50 % | 50 % |
| 4 | 250 ते 500 | 0 | 0 | 30 % | 40 % | 50 % |
| 5 | 500 पेक्षा अधिक क्षेत्र | 0 | 0 | 0 | 0 | 0 |

टिपः 1) वाणिज्य वापरासाठी पुढील बाजूच्या सामासिक अंतरामध्ये शिथिलता देण्यात येणार नाही.

2) नियमित आकारमान नसलेले प्लॉटस साठी प्रकरणानिहाय मंजूर सुधारीत विकास नियंत्रण नियमावली मधील नियम क्र. 32 (2) प्रमाणे आयुक्तांचे अधिकार राहतील.

**विषय क्र.७**

नावामनपा अंतर्गत कै.भूजंगसिंघ गाडीवाले व्यायाम शाळा वजिराबाद व किल्ला व्यायाम शाळा या दोन व्यायाम शाळा कार्यान्वीत असून या ठिकाणी महानगपालिकेकडून मानधनावर कार्यरत ४ पहेलवान (कुस्तीशिक्ष्क) यांचेकडून मल्लांना कुस्तीचे प्रशिक्षण देण्याचे काम केले जात आहे.

सदरील पहेलवान (कुस्ती शिक्षक) हे प्रतिमहा मानधन रु.5000/-यावर काम करीत असून सध्यस्थितीत पहेलवान (कुस्तीशिक्षक) यांना देण्यात येणारे मानधन हे अपुरे असुन कौटुंबिक खर्च व उदरनिर्वाहासाठी आर्थिक परिस्थिती बिकट होत असल्याने मानधनामध्ये वाढ करण्याबाबत यापैकी काही पहेलवानानी मागणी केलेली आहे. महानगरपालिके अंतर्गत कार्यान्वीत व्यायाम शाळेतील सभासद (मल्ल) यांचे प्रशिक्षणासाठी सदर पहेलवान (कुस्तीशिक्षक) यांची आवश्यकता असल्याबाबत स्टेडीयम व्यवस्थापक यांनी अहवाल दिला आहे.

तथापी महानगरपालिकेकडून चालविण्यात येणा-या व्यायाम शाळेत प्रशिक्षण देण्यासाठी सदर पहेलवानांची आवश्यकता असल्याने व संबंधितांच्या आर्थिक परिस्थिती बिकट असल्यामूळे कौटुंबिक अडचणीचा विचार करुन मानधनात वाढ करण्याचे संबंधित हे विनंती करीत असल्याने सर्व संसबंधिताचे कामाच स्वरुप व उपभोगिता विचारात धेता सदर ४ पहेलवान (कुस्तीशिक्षक) यांना सध्या प्रतिमहा देण्यात येणारे मानधन रु.5000/- यामध्ये प्रत्येक रु. 2000/- वाढ करुन ते प्रतिमहा रु. 7000/-एवढे मानधन अदाई करण्यास मान्यतेस्तव सादर.

**सविता कंठेवाड** महानगरपालिकेची वेबसाईट चालू आहे या वेबसाईटवर महानगरपालिकेचे किती कुस्ती आखाडे आहेत याकरीता किती कुस्तीशिक्षक मानधनावर काम करतात यामध्ये किती मल्लांना कुस्तीचे प्रशिक्षण देण्यात येते कुस्तीचे प्रशिक्षण दिलेल्या मल्लांनी कोणकोणत्या स्पर्धेत भागा घेतला याची माहिती टाकण्यात यावी जेणे करुन महानगरपालिका खेळाकरीता करीत असलेल्या कामाची माहिती नागरीकांना कळू शकेल.

**अशोक उमरेकर** मागील १०-१२ वर्षापासुन हे कुस्ती प्रशिक्षक मानधनावर काम करीत आहेत पुर्वी त्यांना फक्त रु.२००० मानधन देण्यात आले होते २०१२ मध्ये त्याचे मानधन वाढवून ते रु.५००० करण्यात आले आणि आता ते रु.७००० करण्याचा प्रस्ताव आहे.आजच्या महागाईच्या काळात रु.७००० मध्ये त्यांच्या कुटुंबियाचा उदर निर्वाह होवू शकत नाही करीता रु.१२००० मानधन देण्यास मान्यता देण्यात यावे तसेच त्याचे शरीर बळकट राहण्यासाठी काजु बदाम करीता विशेष आहार भत्ता देण्यात यावा. .

**विरेद्रसिंघ गाडीवाले** महानगरपालिकेने मल्लांना कुस्तीचे प्रशिक्षण देण्यासाठी जे आखाडे तयार केलेले आहे त्यातील माती जुनी झालेली आहे आखाडा ही खराब झालेला आहे त्याची दुरुस्ती करण्यात यावी तसेच कुस्तीकरीता कुस्ती गादी खरेदी करण्यात यावी जेणे करुन चांगले मल्ल तयार होवू शकतील. महानगरपालिके मार्फत क्रिकेट ,बॅडमेंटन,टेबल टेनिस ,स्विमीग ,ई.खेळाचे शिबिरे आयोजित करण्यात येतात परंतु कुस्तीचे शिबिर आयोजित करण्यात येत नाही. कूस्तीचे ही शिबिर घेण्यात यावे. स्पर्धेचे आयोजन करण्यात यावे.कुस्तीचे

| | |
|---|---|
| | ॲसेसमेंट व्हावयास पाहिजे. कुस्ती आखाडयात सुधारणा करण्यात यावी जेणे करुन चांगले मल्ल तयार होवू शकतील. |
| **उमेश चव्हाण** | श्री उमरेकर यांनी रु.१२००० मानधन देण्याचा जो प्रस्ताव मांडला त्यास माझे अनुमोदन आहे. पुर्वी रु.२००० मानधन मिळत होते मी मागील कॉन्सीमध्ये रु.५००० मानधन करण्याचा प्रस्ताव मांडला होता त्यास सभागृहाने मान्यता दिली होती. महागाई नुसार त्यांना रु.१२००० मानधन करण्यात यावे. |
| **सरजितसिंघ गिल** | कुस्ती प्रशिक्षकाना मानधन वाढविण्याबाबत चर्चा करण्यात येत आहे परंतु या अनुषंगाने माझी सुचना आहे की महानगरपालिकेत विविध विभागात अनेक वर्षापासुन कंत्राटी तत्वावर एकत्रित वेतनावर रोडकारकुन, संगणक ऑपरेटर, क.अभियंता ई.पदावर कर्मचारी काम करीत आहेत त्यांनाही न्याय देण्याचा प्रयत्न करण्यात यावा त्याचे एकत्रित वेतन वाढविण्याबाबत निर्णय घेण्यात यावा. |
| **विरेंद्रसिंघ गाडीवाले** | श्री गिल यांनी जो प्रस्ताव मांडला त्यास माझे अनुमोदन आहे. कुस्ती शिक्षक अनेक दिवसापासुन एकत्रित वेतनावर काम करीत आहे. महानगरपालिकेच्या कर्मचारी आकृतीबंधामध्ये कुस्ती शिक्षक यापदाचा समावेश करुन त्यांना महानगरपालिका सेवेत नियमित वेतनश्रेणीत घेण्याची कार्यवाही करण्यात यावी. |
| **आयुक्त** | महानगरपालिकेची वेबसाईट अद्यावत झालेली नाही.कार्य अद्यावतीकरण प्रगतीपथवर आहे. लवकरच वेबसाइट अद्यावत करुन महानगरपालिकेच्या विविध विभागाची माहिती संकलीत करुन ती वेबसाईटवर टाकण्यात येईल. कुस्ती प्रशिक्षकांना रु.७००० प्रतिमहा याप्रमाणे मानधन देण्याचा प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे तुर्त या प्रस्तावास मान्यता देण्यात यावी. नियमानुसार त्यांना जास्तीतजास्त किती मानधन देता येईल याची माहिती मागवून मानधन वाढीचा निर्णय घेण्यात येईल. |
| **महापौर** | आयुक्ताचे प्रस्तावास तसेच सरजितसिंघ गिल यांचे प्रस्तावास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. |

**ठराव क्र.१८२** **ठ रा व**

नावामनपा अंतर्गत कै.भूजंगसिंघ गाडीवाले व्यायाम शाळा वजिराबाद व किल्ला व्यायाम शाळा या दोन व्यायाम शाळा कार्यान्वीत असून या ठिकाणी महानगपालिकेकडून मानधनावर कार्यरत ४ पहेलवान (कुस्तीशिक्षक) यांचेकडून मल्लांना कुस्तीचे प्रशिक्षण देण्याचे काम केले जात आहे.

सदरील पहेलवान (कुस्ती शिक्षक) हे प्रतिमहा मानधन रु.5000/-यावर काम करीत असून सध्यस्थितीत पहेलवान (कुस्तीशिक्षक) यांना देण्यात येणारे मानधन हे अपुरे असुन कौटुंबिक खर्च व उदरनिर्वाहासाठी आर्थिक परिस्थिती बिकट होत असल्याने मानधनामध्ये वाढ करण्याबाबत यापैकी काही पहेलवानानी मागणी केलेली आहे. महानगरपालिके अंतर्गत कार्यान्वीत व्यायाम शाळेतील सभासद (मल्ल) यांचे प्रशिक्षणासाठी सदर पहेलवान (कुस्तीशिक्षक) यांची आवश्यकता असल्याबाबत स्टेडीयम व्यवस्थापक यांनी अहवाल दिला आहे.

तथापी महानगरपालिकेकडून चालविण्यात येणा-या व्यायाम शाळेत प्रशिक्षण देण्यासाठी सदर पहेलवानांची आवश्यकता असल्याने व संबंधितांच्या आर्थिक परिस्थिती बिकट असल्यामूळे कौटुंबिक अडचणीचा विचार करुन मानधनात वाढ करण्याचे संबंधित हे विनंती करीत असल्याने सर्व संसबंधिताचे कामाच स्वरुप व उपभोगिता विचारात धेता सदर ४ पहेलवान (कुस्तीशिक्षक) यांना सध्या प्रतिमहा देण्यात येणारे मानधन रु.5000/- यामध्ये प्रत्येक रु.2000/-वाढ करुन ते प्रतिमहा रु.7000/-एवढे मानधन अदाई करण्याची प्रशासकीय व आर्थिक मान्यता ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते देते.तसेच या कुस्ती शिक्षकांना आपल्या कुटुंबियाचा चरितार्थ चालविण्यासाठी शासन निर्णयानुसार त्यांना जास्तीत जास्त किती मानधन देणे आवश्यक आहे याची चौकशी करुन शासन निर्णयानुसार त्यांचे मानधनात वाढ करण्याची पुढील वैधानिक कार्यवाही आयुक्तांनी करावी.असेही ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते संमत करते.तसेच महानगरपालिका कर्मचा-याच्या आकृतीबंधामध्ये ४ कुस्ती शिक्षक यापदाचा समावेश करुन कार्यरत कुस्ती शिक्षकांना महानगरपालिका सेवेत नियमित वेतनश्रेणीत घेण्याची कार्यवाही करण्यात यावी.

तसेच नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेत अनेक वर्षापासून कनिष्ट अभियंता, संगणक चालक, रोडकारकुन अशा विविध पदावर कत्राटी तत्वावर एकत्रित वेतनावर काम करीत असून त्यांना देण्यात येत असलेले एकत्रित वेतन खुप कमी असून त्यामध्ये त्यांच्या कुटुंबियांचा उदर निर्वाह होत नाही करीता कंत्राटी तत्वावर कनिष्ट अभियंता, संगणक चालक, रोडकारकुन अशा विविध पदावर काम करीत असलेल्या कर्मचा-यांना कामगार अधिनियमाप्रमाणे/शासन निर्णया प्रमाणे एकत्रित वेतन वाढविण्यासाठी आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी असेही ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते संमत करते. व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्र.८**

नांवामनपा हध्दीतील प्रभाग क्र. ३० मधील जुने नांदेड शहर गणीमपुरा/सिध्दनाथपुरी भागात पुरातन कालिन श्रीमत जगदगुरु शंकराचार्य मठ आहे. सदर मठास मुख्य रस्त्याशी जोडाणारा रस्ता हा अत्यंत अरुंद आहे. सदर रस्त्यासाची सध्याची असितत्वातील रुंदी ही सुमारे २.५० मी.ते ३० .०० मी. आहे. व रस्त्यात तीन ठिकाणी इलेक्ट्रीकल्स पोल्स व टेलिफोनचे पोल्स आहेत. तसेच रस्त्याच्या एका बाजुनी नाली आहे.त्यामूळे येथे एकेरी वाहतुक करता येत नाही. किंवा रिक्षा,अटोरिक्षा,फायरगाडी ,एम्बुलन्स नेता येत नाही. व नागरी सुविधा पोहचविता येत नाही.

करीता सदर रस्त्यची रुंदी वाढवून नविन रस्त्यचे काम हाती घेण्यासाठी या भागातील सचिव मठ शंकराचार्य सिध्दनाथपुरी नांदेड यांनी दि.६.७.२०१४ रोजी पत्रान्वये विनंती केली व तसेच मा.आ. श्री अमरनाथजी राजुरकर यानी दि.७.७.२०१४ रोजी मा.आयुक्त यांना पत्रान्वये कळविले त्या अनुषंगाने सदर रस्त्याचे प्राथमिक सर्वेक्षण करुन सुमारे २८०.०० मी.लांबीचा व ९.०० मी रुंदीचा रस्ता प्रस्तावित करणे आवश्यक आहे.सदर रस्ता हा पुढे लक्ष्मीनगर हातजोडी रस्त्यापर्यंत रुंद करणे आवश्यक आहे. त्यामूळे गोदावरी नदीकाठ ते नावघाटकडे सहज जाता येईल सदर रस्त्याचे रुंदीकरणाचे काम हाती घेण्यासाठी त्यांच्या दोन्ही बाजुच्या मालमत्तेचे आवश्यक तीतके भुसंपादन करणेआवश्यक आहे. त्याकरीता बाधीत मालमत्ता धारकांना टिडीआर /वाढीव एफएसआय किंव मावेजा देण्याच्या कार्यवाहीस जो ७.०३ कोटी खर्च येईल त्या खर्चास सर्वसाधारण सभेची मान्यता धेणे आवश्यक आहे.

करीता सदर भूसंपादन व रस्त्यांच्या कामास लागणा-या खर्चास मंजुरी घेण्यासाठी व मा.आयुक्त यांना वैधानिक अधिकार प्राप्त होण्यासाठी प्रस्ताव सादर

**स.शेर अली** — सदरचा रस्ता रुंद करण्यास आमचा विरोध असून संबंधित भागातील नागरीकांचा विरोध आहे.कारण रस्त्याच्या रुंदीकरणामूळे अनेक नागरीकाचे उध्दवस्त होणार आहे या रस्त्यावर मस्जीद आहे त्यामूळे नागरीकांना या रस्त्यास विरोध केलेला आहे. तसेच मठापासुन ते अब्दुल रहिमान उर्दू दै.सहेर कार्यालयापर्यंत पर्यायी रस्ता उपलब्द करुन देण्यात यावा.

**विरेद्रसिंघ गाडीवाले** — त्या भागातील लोकसंख्या नुसार प्रस्तावीत रस्त्याचे रुंदीकरण करणे आवश्यक असल्यामूळे आयुक्तांनी रस्ता रुंदीकरणाचा प्रस्ताव दिलेले आहे तो योग्य आहे त्यास मान्यता देण्यात यावी.

**दिपकिंसह रावत** — स्थानिक स्वराज्य संस्थेतून निवडून आलेले आमदारानी सदरचा रस्ता रुंद करण्यासाठी कळविलेले आहे.त्याबध्दल मी त्याचे अभिनंदन करतो. ब-याच दिवसापासून या रस्त्याची रुंदीकरणाची मागणी असल्यामूळे या प्रस्तावास मान्यता देण्यात यावी.

**नवलकुमार पोकर्णा** — ४-५ गल्लीला जोडणारा रस्ता असल्यामूळे याप्रस्तावास मान्यता देण्यात यावी.

**स.शेर अली** — या रस्त्याचे रुंदीकरणास आमचा विरोध नाही परंतु मठापासून ते दै.सहेर उर्दू कार्यालयापर्यंत पर्यायी रस्ता देण्यात यावा.

**तुलजेस यादव** — या रस्त्याचे रुंदीकरण करणे आवश्यक असल्यामूळे आयुक्तांचे प्रस्तावास मान्यता देण्यात यावी.किल्ला ते भोजालाला गवळी चौक ते नविन पुलाकडे जाणारा रस्त्याचे रुंदीकरण करण्यात यावे

**महापौर** — आयुक्ताचे प्रस्तावास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र.१८३** **ठ रा व**

नांवामनपा हध्दीतील प्रभाग क्र. ३० मधील जुने नांदेड शहर गणीमपुरा/सिध्दनाथपुरी भागात पुरातन कालिन श्रीमत जगदगुरु शंकराचार्य मठ आहे. सदर मठास मुख्य रस्त्याशी जोडाणारा रस्ता हा अत्यंत अरुंद आहे. सदर रस्त्यासाची सध्याची असितत्वातील रुंदी ही सुमारे २.५० मी.ते ३० .०० मी. आहे. व रस्त्यात तीन ठिकाणी इलेक्ट्रीकल्स पोल्स व टेलिफोनचे पोल्स आहेत. तसेच रस्त्याच्या एका बाजुनी नाली आहे.त्यामूळे येथे एकेरी वाहतुक करता येत नाही. किंवा रिक्षा, अटोरिक्षा, फायरगाडी ,एम्बुलन्स नेता येत नाही. व नागरी सुविधा पोहचविता येत नाही.

करीता सदर रस्त्यची रुंदी वाढवून नविन रस्त्यचे काम हाती घेण्यासाठी या भागातील सचिव मठ शंकराचार्य सिध्दनाथपुरी नांदेड यांनी दि.६.७.२०१४ रोजी पत्रान्वये विनंती केली व तसेच मा.आ. श्री अमरनाथजी राजुरकर यानी दि.७.७.२०१४ रोजी मा.आयुक्त यांना पत्रान्वये कळविले त्या अनुषंगाने सदर रस्त्याचे प्राथमिक सर्वेक्षण करुन सुमारे २८०.०० मी.लांबीचा व ९.०० मी रुंदीचा रस्ता प्रस्तावित करणे आवश्यक आहे.सदर रस्ता हा पुढे लक्ष्मीनगर हातजोडी रस्त्यापर्यंत रुंद करणे आवश्यक आहे. त्यामूळे गोदावरी नदीकाठ ते नावघाटकडे सहज जाता येईल सदर रस्त्याचे रुंदीकरणाचे काम हाती घेण्यासाठी त्यांच्या दोन्ही बाजुच्या मालमत्तेचे आवश्यक तीतके भुसंपादन करणेआवश्यक आहे. त्याकरीता बाधीत मालमत्ता धारकांना टिडीआर /वाढीव एफएसआय किंव मावेजा देण्याच्या कार्यवाहीस जो अंदाजित ७.०३ कोटी खर्च येईल त्या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमत देते. नियमानुसार भुसंपादन करण्याची पुढील वैधानिक कार्यवाही करण्याचे पुर्ण् अधिकार आयुक्त,नांवामनपा यांना ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्र.९**

नावामनपा सर्वसाधारण सभेने दि.१८.८.२००९ रोजी संमत केलेला ठराव क्र.५४ अन्वये राज्य शासकीय कर्मचा-या प्रमाणे नावामनपा सेवा निवृत्त/कार्यरत अधिकारी ,कर्मचारी कामगार यांना दि.१.१.२००६ पासून सहावा वेतन आयोग लागू करण्यास मान्यता दिल्याप्रमाणे कार्यालयीन आदेश क्र. मनपा/साप्रवि/५/२०१० दि.२.४.२०१० नुसार सुधारीत वेतनश्रेणीमध्ये दि.१ जानेवारी २००६ पासून वेतन निश्चिती करुन सुधारीत वेतनश्रेणीचा प्रत्यक्षलाभ १ मे २०१० पासून वेतनात समाविष्ट करुन देण्यात आला आहे.

सहाव्या वेतन आयोगातील सुधारीत वेतनश्रेणी मूळे १ जानेवारी २००६ पासून अनुज्ञेय होणारी फरकाची रक्कम १ एप्रिल २०१२ नंतर महानगरपालिकेच्या आर्थिक परिस्थितीनुसार फरकाची रक्कम अदा करण्यात येईल असे उपरोक्त आदेशात नमूद केल्यानुसार मनपा शिक्षण अस्थापनेवरील कर्मचा-याचे ५० टक्के वेतन हे राज्य शासनाकडून सहाव्या वेतन आयोगाच्या फरकाची रक्कम ही मनपाकेस प्राप्त झालेली आहे.त्यानुसार मनपा शिक्षण अस्थापनेवरील कर्मचा-याचे सहावा वेतन आयोगाचे फरकातील ५०टक्के रक्कम ८३,२१,२९०/-

(अक्षरी रु.त्र्याऐंशी लक्ष एकविस हजार दोनशे नव्वद फक्त्) एक रक्कमी अदा करण्यास कार्यालयीन आदेश क्र. नावाश्मनपा/शिअ/२१६४२/२०१५ दि.१०.२.२०१५४ अन्वये प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात आली तसेच उर्वरीत ५० टक्के फरकाची रक्कम ही नियमाप्रमाणे ५२ महिण्यात अदा करण्यास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात आली त्यास कार्योत्तर मान्यता देणे बाबत.

**महापौर** कार्योत्तर मान्यता देण्यात येते .

**ठराव क्र.१८४** **ठ रा व**

नावामनपा सर्वसाधारण सभेने दि.१८.८.२००९ रोजी संमत केलेला ठराव क्र.५४ अन्वये राज्य शासकीय कर्मचा-या प्रमाणे नावामनपा सेवा निवृत्त/कार्यरत अधिकारी ,कर्मचारी कामगार यांना दि.१.१.२००६ पासून सहावा वेतन आयोग लागू करण्यास मान्यता दिल्याप्रमाणे कार्यालयीन आदेश क्र. मनपा/साप्रवि/५/२०१० दि.२.४.२०१० नुसार सुधारीत वेतनश्रेणीमध्ये दि.१ जानेवारी २००६ पासून वेतन निश्चिती करुन सुधारीत वेतनश्रेणीचा प्रत्यक्षलाभ १ मे २०१० पासून वेतनात समाविष्ट करुन देण्यात आला आहे.

सहाव्या वेतन आयोगातील सुधारीत वेतनश्रेणी मूळे १ जानेवारी २००६ पासून अनुज्ञेय होणारी फरकाची रक्कम १ एप्रिल २०१२ नंतर महानगरपालिकेच्या आर्थिक परिस्थितीनुसार फरकाची रक्कम अदा करण्यात येईल असे उपरोक्त आदेशात नमूद केल्यानुसार मनपा शिक्षण अस्थापनेवरील कर्मचा-याचे ५० टक्के वेतन हे राज्य शासनाकडून सहाव्या वेतन आयोगाच्या फरकाची रक्कम ही मनपाकेस प्राप्त झालेली आहे.त्यानुसार मनपा शिक्षण अस्थापनेवरील कर्मचा-याचे सहावा वेतन आयोगाचे फरकातील ५०टक्के रक्कम ८३,२१,२९०/- (अक्षरी रु.त्र्याऐंशी लक्ष एकविस हजार दोनशे नव्वद फक्त्) एक रक्कमी अदा करण्यास कार्यालयीन आदेश क्र. नावाश्मनपा/शिअ/२१६४२/२०१५ दि.१०.२.२०१५४ अन्वये प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात आली तसेच उर्वरीत ५० टक्के फरकाची रक्कम ही नियमाप्रमाणे ५२ महिण्यात अदा करण्यास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात आली त्यास कार्योत्तर मान्यता ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते देते .

**विषय क्र.१०**

नांवामनपाकेचे शहरात मोठया प्रमाणात व्यापारी संकुले असुन महापालिकेच्या मालकीच्या व्यवसायीक/सार्वजनिक उपयोगाच्या मोकळया जागा उपलब्ध्द आहेत तसेच शहरात सार्वजनिक सुविधा, मार्केट इत्यादी उभारण्याकरीता विकास योजनेतील आरक्षणाखालील जागा व इतर जागा देखील महानगरपालिका संपादित करते.

सध्या असलेले मार्केटचे देखभाल व दुरुस्तीकरीता विशेष अशी यंत्रणा नाही, तसेच अनेक मार्केटच्या इमारती जुन्या झालेल्या असुन त्याचे नव्याने नुतनीकरण,पुर्नरबांधणी करणे आवश्यक आहे. महानगरपालिकेचे सिमित उत्पन्न लक्षात घेता महानगरपालिका खाजगी कार्यकंपनी (S.P.V.) स्थापन केल्यास विविध मार्केट,मैदान,करमणुक केंद्र, जलतरणिका देखभाल दुरुस्ती ,पुर्नरनिर्माण इत्यादी कामे जास्त कुशलतेने व शिघ्रतेने पुर्ण करता येईल ,महानगरपालिकेच्या उत्पन्नात वाढ होणार आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ६६ अ नुसार शासनाच्या मान्यतेने अशी कंपनी (S.P.V.) स्थापन करणेची तरतूद आहे.

<u>कंपनीचे सर्वसाधारण उध्देश</u>

१) महापालिकेच्या मालकीच्या जुन्या झालेल्या मार्केटचा पुर्ण विकास करणे,

२) महापालिकेच्या मालकीच्या विविध मोकळया जागांवर सार्वजनिक सुविधा/इमारती/संकुले उभारणे.

३) विविधभागात महापालिकेचे मार्केट उपलब्ध्द करुन देण्याकरीता जागा संपादित करणे.

४) विविध मार्केट बाजार याची देखभाल/दुरुस्ती ,दैनंदिन व्यवस्थापन यासाठी उपाय योजना करणे.

५) विविध विकास कामाकरीता निधी उभारणे.

६) महापालिकेच्या सर्व जागा/इमारती यांचा जास्तीत जास्त प्रभावी उपयोग करुन महापालिकेच्या उत्पन्नात भर टाकणे.

<u>फायदे</u>

१) कंपनी स्थापन केल्यामूळे निर्णय प्रक्रिया जास्त जलद व परिणामकारक होईल.

२) कंपनीस्थापन केल्यामूळे त्या त्या क्षेत्रातील तंज्ञ/कुशल सल्लागार याचे मार्गदर्शन घेणे सुलभ होईल.

३) महापालिकेच्या इमारती उभारण्याकरीता बी.ओ.टी. तत्वावर खाजगी व्यक्तीची नियुक्ती करण्याऐवजी कंपनी स्वतः अशी कामे करु शकेल.

४) कंपनी स्वत: चे भाग भाडंवल वाढविण्याकरीता उपाय योजना करु शकेल.

५) महापालिकेच्या मालकीची कंपनी असल्यामूळे सर्व जागांची मालकी कायम महापालिकेकडे राहील.

<u>रचना</u>

१) सदर कपंनीच्या संचालक ,मंडळावर एकूण (११) सदस्य असावेत. त्यापैकी मा.महापौर पदसिध्द अध्यक्ष असतील, महानगरपालिका आयुक्त हे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक असतील,महापालिकेचे उपमहापौर, स्थायी समिती सभापती,विरोधीपक्ष नेता व सभागृह नेता हे सदर कंपनीचे पदसिध्द सदस्य् असतील, ( ५) संचालक महानगरपालिकेच्या अंतर्गत कार्यरत संबंधित तांत्रिक/वित्त विभागाचे खाते प्रमुखाकडून किंवा वरिष्ठ अधिकारी यांचे मधून महानगरपालिका आयुक्तांकडून नियुक्त केल्या जातील. वर नमूद केल्या प्रमाणे महानगरपालिकेच्या मालकीची जागा / इमारती यांची देखभाल व विकास करण्याकरीता नांदेड वाधाळा शहर महानगरपालिकेच्या मालकीची

एक विशेष कार्यकंपनी (S.P.V.)" नांदेड वाधाळा शहर महानगरपालिका मालमत्ता व इमारती देखभाल व विकास कंपनी" महाराष्ट्र शासनाचे मान्यतेने स्थापन करण्याकरीता मान्यता देणे बाबत.

**प्रमोद खेडकर** — तत्कालिन नांदेड नगरपालिकेने आपल्या मालकीच्या जागा अनेक सस्थानां शैक्षणिक उपक्रमाकरीता लिजवर दिलेल्या आहेत परंतु त्या जागेचा उपयोग शैक्षणिक कार्याकरीता न करता घराचे बाधकामाकरीता वापरीत आहेत त्यामूळे अशा जागा महानगरपालिकेने आपल्या ताब्यात घ्याव्यात.

**उमेशसिह चव्हाण** — सर्व पक्षाच्या नेत्याशी चर्चा करुन या प्रस्तावावर निर्णय धेण्यात यावा.

**दिपकसिंह रावत** — विशेष कार्यकंपनी स्थापन केल्यामूळे महानगरपालिकेचे कशा प्रकारे उत्पन्न वाढेल काय फायदा होइल यापुर्वी असा प्रसताव का देण्यात आला नाही आताच का देण्यात आला.

**आयुक्त** — प्रस्तावात विशेष कार्यकंपनी स्थापन केल्यानंतर फायदे व उध्देश चा खुलासा करण्यात आलेला आहे. जेएनएनयुआरएम योजने अंतर्गत महानगरपालिकेने शहरात अनेक विकासाची कामे पुर्ण केली रस्त्याचे रुंदी करण केलेले असून महागनरपालिकेच्या मालकीच्या ब-याचश्या जागा मोकळया आहेत तेथे विशेष कार्यकंपनी मार्फत नियोजन करुन शॉपिंग कॉम्प्लेक्सचे बांधकाम करुन कमर्शियल वापर केला तर महानगरपालिकेचे उत्पन्नात निश्चितच वाढ होईल. महानगरपालिकेने बीओटी तत्वावर शॉपिंग कॉम्प्लेक्स च्या बांधकामासाठी ३० वर्षापेक्षा अधिक कालावधीसाठी आपल्या मोक्याचा जागा लिजवर दिलेल्या आहेत सध्या त्यापासुन महानगरपालिकेला काहीच फायदा नाही. ज्या जागाची दुकांनाची भाडेपटी संपली आहे त्यांनाही नियमाप्रमाणे भाडेवाढकरुन मुदतवाढ देण्याची कार्यवाही या विशेष कार्य कंपनी करता येईल.विविध कामासाठी भुसंपादानाची कार्यवाही करता येवू शकेल. शासनास उत्पन्न वाढीच्या दृष्टीकोनातून सुधारणा (रिफार्म ) केल्याचे सांगुन नांदेडचा समावेश स्मार्ट सिटी मध्ये समावेश होण्यासाठी प्रयत्न करण्यास मदत होईल

**दिपकसिंह रावत** — विशेष कार्य कंपनी जे काही निर्णय घेईल त्या सर्व निर्णयास सर्व साधारण सभेची मान्यता घेवूनच आयुक्तांनी पुढील वैधानिका कार्यवाही करावी. सर्वसाधारण सभेच्या मान्यतेशिवाय विशेष कार्य कंपनीच्या निर्णयाची अमलबजावणी करण्यात येवू नये .

**बाळासाहेब देशमूख** — कार्य कंपनीचा निर्णय सर्वसाधारण सभेच्या मान्यतेसाठी आणावे

**स.जानी म.कासिम** — जिल्हा परिषदेच्या बाजूची व मध्यवर्ती जकात नाक्याची जागा बीओटी तत्वावर विकसति करण्यासाठी खाजगी कत्राटदारास देण्यात आलेली आहे या कंत्राटदाराने ४-५ मजली इमारत बांधून त्यातील गाळे भाडेपटीवर देवून लाखो रुपये कमवीत आहे त्यापासुन महानगरपालिकेस काहीच उत्पन्न मिळत नाही करीता शासनाचे मान्यतेने ती जागा परत घेण्यात यावी.

**स.शेर अली** — आयुक्तांनी महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविण्यासाठी जो प्रस्ताव सादर केलेला आहे तो चांगला प्रस्ताव आहे त्यास मान्यता देण्यात यावी. विशेष कार्य कंपनीच्या सदस्य पदी सर्व राष्टवादी ,एमआयएम या पक्षाच्या पक्षातील नगरसेवकांना प्रतिनिधीत्व देण्यात यावे.व या समितीच्या सदस्यीय सख्या ही १६ निश्चित करण्यात यावी.व या ५ समितीच्या सदस्याची निवड करण्याचे अधिकार महापौरांना देण्यात यावे.

**आनंद चव्हाण** — श्री स.शेर अली यांनी जो प्रस्ताव मांडला त्यास माझे अनुमोदन आहे. या समितीमध्ये सर्व पक्षाचे सदस्यांच्या समावेश करण्यात यावा. श्री अ.सत्तार श्री स.शेर अली ,श्री सरजितसिंघ गिल , श्री नवलकुमार पोकर्णा, यांना घेण्यात यावे.व आयुक्त या कार्यसमितीचे सचिव असतील.

**महापौर** — आयुक्तांनी मांडलेल्या प्रस्तावात श्री स.शेर अली यांनी सुचविल्या प्रमाणे दुरुस्ती करुन प्रस्तावास मान्यता देण्यात येते. तसेच या समितीत श्री आनंद चव्हाण यांचाही समावेश करुन प्रस्तावास मान्यता देण्यात येते.

**ठराव क्र.१८५** — **ठ रा व**

नांवामनपाकेचे शहरात मोठया प्रमाणात व्यापारी संकुले असुन महापालिकेच्या मालकीच्या व्यवसायीक/सार्वजनिक उपयोगाच्या मोकळया जागा उपलब्ध्द आहेत तसेच शहरात सार्वजनिक सुविधा, मार्केट इत्यादी उभारण्याकरीता विकास योजनेतील आरक्षणाखालील जागा व इतर जागा देखील महानगरपालिका संपादित करते.

सध्या असलेले मार्केटचे देखभाल व दुरुस्तीकरीता विशेष अशी यंत्रणा नाही, तसेच अनेक मार्केटच्या इमारती जुन्या झालेल्या असुन त्याचे नव्याने नुतनीकरण, पुर्नरबांधणी करणे आवश्यक आहे. महानगरपालिकेचे सिमित उत्पन्न लक्षात घेता महानगरपालिका खाजगी कार्यकंपनी (S.P.V.) स्थापन केल्यास विविध मार्केट,मैदान,करमणुक केंद्र, जलतरणिका देखभाल दुरुस्ती ,पुर्नरनिर्माण इत्यादी कामे जास्त कुशलतेने व शिघ्रतेने पुर्ण करता येईल व त्यामूळे ,महानगरपालिकेच्या उत्पन्नात वाढ होणार आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ६६ अ नुसार शासनाच्या मान्यतेने अशी कंपनी (S.P.V.) स्थापन करणेची तरतूद आहे.

करीता आयुक्तांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार नांदेड वाधाळा शहर महानगरपालिकेतील खालील प्रमाणे अधिकारी व पदाधिका-यांची (१६) सदस्यांची खाजगी कार्यकंपनी (S.P.V.) स्थापन करण्यास ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते.

**<u>नांदेड वाधाळा शहर महानगरपालिका मालमत्ता व इमारती देखभाल व विकास"कार्यकंपनी (S.P.V.)ची कार्यकारीणी</u>**

१) महापौर, कार्यकारीणी अध्यक्ष
२) आयुक्त, कार्यकारीणी सचिव
३) उपमहापौर, कार्यकारीणी पदसिध्द सदस्य
४) सभापती,स्थायी समिती, कार्यकारीणी पदसिध्द सदस्य
५) सभागृह नेता, कार्यकारीणी पदसिध्द सदस्य
६) विरोधी पक्षनेता, पदसिध्द सदस्य
७) श्री अ.सत्तार अ.गफुर, कार्यकारीणी सदस्य
८) श्री आनंद चव्हाण, कार्यकारीणी सदस्य
९) श्री सरजितसिंघ गिल, कार्यकारीणी सदस्य
१०) श्री स.शेर अली महेबुब अली, कार्यकारीणी सदस्य
११) श्री नवलकुमार पोकर्णा, कार्यकारीणी सदस्य

या व्यतिरिक्त ( ५) संचालक महानगरपालिकेच्या अंतर्गत कार्यरत संबंधित तांत्रिक/वित्त विभागाचे खाते प्रमुखाकडून किंवा वरिष्ठ अधिकारी यांचे मधून महानगरपालिका आयुक्तांकडून नियुक्त केलेले अधिकारी असतील.

नांदेड वाधाळा शहर महानगरपालिका मालमत्ता व इमारती देखभाल व विकास"कार्यकंपनीचे खालील प्रमाणे कार्यक्षेत्र निश्चित करण्यास ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते.

१) महापालिकेच्या मालकीच्या जुन्या झालेल्या मार्केटचा पुर्ण विकास करणे,
२) महापालिकेच्या मालकीच्या विविध मोकळया जागांवर सार्वजनिक सुविधा/इमारती/संकुले उभारणे.
३) विविधभागात महापालिकेचे मार्केट उपलब्ध्द करुन देण्याकरीता जागा संपादित करणे.
४) विविध मार्केट बाजार याची देखभाल/दुरुस्ती ,दैनंदिन व्यवस्थापन यासाठी उपाय योजना करणे.
५) विविध विकास कामाकरीता निधी उभारणे.
६) महापालिकेच्या सर्व जागा/इमारती यांचा जास्तीत जास्त प्रभावी उपयोग करुन महापालिकेच्या उत्पन्नात भर टाकणे.

**विषय क्र.११** **प्रस्ताव**

विष्णुपुरी उपसा जलसिंचन या प्रकल्पातून नांदेड शहराला पाणी पुरवठा होतो दरवर्षी फेब्रूवारी महिण्यापासून अवैध पाणी उपसा व बाष्पीभवन या कारणामूळे धरणातील पाणी साठा कमी होवून शहरास पाणी टंचाई भासते .धरणात गाळ साचल्यामूळे धरणाची साठवण क्षमता कमी झालेली आहे.कारण धरण बांधले तेंव्हापासून आज पर्यत धरणातील गाळ काढण्यात आलेला नाही.धरणातील गाळ काढल्यास धरणाची साठवण क्षमता वाढून नांदेडकरांना बारमाही पिण्याचे पुरेसे पाणी उपलब्ध्द होवू शकते. याकरीता महाराष्ट्र शासन जलसंपदा विभागास विष्णुपुरी उपसा जलसिंचन या प्रकल्पातील गाळ काढण्यासाठी विनंती करण्याचा प्रस्ताव महासभेसमोर ठेवण्यात येत आहे.

**सुचकः-** अनुजा अमितसिंह तेहरा **अनुमोदकः-** इशरत फातेमा अ.शमीम

**अनुजा तेहरा** नांदेड शहरास विष्णुपरी शंकर सागरतून पाणी पुरवठा होतो व दरवर्षी उन्हाळयात या जलाशयातील पाण्याचा साठा कमी झाल्यामूळे नागरीकांना पाण्याचा प्रश्न भेडसावतो.या जलाशयाचे बांधकाम ३० वर्षापुर्वी म्हणजे १९८५-८६ ला पुर्ण झाले तेव्हा पासुन या जलाशयातील गाळ काढण्यात आलेला नाही. त्यामूळे जलाशयात मोठया प्रमाणात गाळ जमा झाल्यामूळे जलाश्यातील पाणी साठवण क्षमता खुपच कमी झालेली आहे. जर या जलाशतील गाळ काढण्यात आला तर पाण्याची साठवण क्षमता वाढेल आणि नांदेड शहराचा पाण्याचा कायमचा प्रश्न सुटेल. पुणे शहराला खडकवासला धरणातून पाण्याचा पुरवठा होता या धरणातही मोठया प्रमाणात गाळ जमा झाला होता शासनाच्या पाटबंधारे विभागाने एनजीओ मार्फत धरणातील गाळ काढून पाण्याची साठवण क्षमता वाढविली आहे तरी विष्णुपुरी शंकर सागर मधील गाळ काढण्यासाठी महाराष्ट्र शासनाचे जलसंपदा मंत्री मा.ना.श्री गिरीष महाजन यांना मा.जिल्हाधिकारी यांचे मार्फत विनंती करण्यात यावी. मा.ना.श्री गिरीष महाजन याचे स्विय सचिव आपल्या महानगरपालिकेचे माजी आयुक्त श्री निशीकांत देशपांडे आहेत त्याचेहि आपणास सहकार्य मिळेल. प्रस्ताव शासनास सादर करण्यात यावा.

**दिपकसिंह रावत** सौ.अनुजा तेहरा यांनी शंकर सागर जलाशयातील गाळ काढण्याबाबतचा अतिषय चांगला प्रस्ताव मांडला त्याबध्दल त्यांचे अभिनंदन करावे. गाळ काढण्यासाठी शासनास शिफारस करण्यात यावी.

**स.जानी स.महेमुद** सौ.तेहरा मॅडम यांनी जो प्रस्ताव ठेवला त्याबध्दल मी त्यांची तारीफ करतो.मागील तीन वर्षापासून शहरातील पिण्याच्या पाईप लाईनवर, मोठया गळत्या असल्यामूळे तसेच पाण्याचे व्हाल्व्ह ना दुरुस्त असल्यामूळे मोठया प्रमाणात पाणी नालीत जात आहे. गळत्या व व्हाल्व्ह दुरुस्तीसाठी निविदा काढण्यात आली परंतु कंत्राटदार अर्धवट काम करीत आहे.शहरातील सर्व गळत्याची,व्हाल्व्हची दुरुस्ती करण्यात यावी.

**महापौर** विष्णुपुरी शंकर सागर जलाशयातील गाळ काढण्यासाठीचा प्रस्ताव मंजुर करुन शासनास शिफारस करण्यास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. आयुक्तानी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**ठराव क्र. १८६** **ठ रा व**

विष्णुपुरी येथील शंकर सागर जलाशयातून नांदेड शहराला पाणी पुरवठा होतो दरवर्षी फेब्रूवारी महिण्यापासून अवैध पाणी उपसा व बाष्पीभवन या कारणामूळे या जलाशयातील पाणी साठा कमी होवून शहरात पाणी टंचाई निर्माण होते.तसेच जलाशयाचे काम पुर्ण झाल्यापासुन म्हणजे जवळपास मागील ३० पासुन आज पर्यंत त्यातील गाळ काढण्यात आलेला नाही. मोठया प्रमाणात गाळ साचल्यामूळे जलाशयाची पाण्याची साठवण क्षमता कमी झालेली आहे. या जलाशयातील गाळ काढल्यास प्रकल्पातील पाण्याची साठवण क्षमता वाढून नांदेडकरांना बारमाही पिण्याचे पुरेसे पाणी उपलब्ध्द होवू शकते. करीता महाराष्ट्र शासनामार्फत शंकर सागर जलाशयातील गाळ काढण्यासाठी महाराष्ट शासनाचे जलसंपदा मंत्री मा.ना.श्री गिरीष महाजन यांनाही नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा सर्वानुमते शिफारस करते तसेच विशेष बाब म्हणून जिल्हा नियोजन व विकास समिती नांदेडलाही गाळ काढण्यासाठी विशेष अनुदान मंजुर करण्याची विनंती करण्यात यावी असे ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते संमत करते. व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**नगरसचिव** विषय पत्रिकेवरील विषय क्र. १२ व १८ हे सारखेच असल्यामूळे या दोन्ही प्रस्तावावर एकत्रित निर्णय घेण्यात यावा.

**विषय क्र.१२** **प्रस्ताव**

नांवामनपा शिक्षण विभागात कंत्राटी प्राथमिक शिक्षक (अर्धवेळ सेमी इंग्रजी ) पदी कार्यरत असलेले शिक्षक श्री गाडेगांवकर मारोती बालाजीराज ,मनपा प्राथमिक शाळा क्र.३ जंगमवाडी यांचा अर्धवेळ हा कालावधी पूर्ण करुन त्यांना शिक्षण सेवक (सहायक शिक्षक) म्हणून ग्राहय धरुन त्यांना मनपा कायम स्वरुपी सेवेत सामावून घेण्यात यावे व नियमानुसार योग्य ती वेतनश्रेणी लागू करण्यासाठी हा प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव.

**सुचकः**- आनंद शंकरराव चव्हाण **अनुमोदकः**- बाळासाहेब गंगाधरराव देशमूख,(सं.पा.)

**विषय क.१८** **प्रस्ताव**

नांवामनपाकेच्या शिक्षण विभागात माध्यमिक/प्राथमिक शिक्षक पदी काम करणा-या शिक्षकांचा 3 वर्षाचा कंत्राटी कालावधी पुर्ण झालेला असून त्यांचा हा कालावधी शिक्षक सेवक (सहायक शिक्षक) म्हणून ग्राहय धरुन त्यांना नियमित सेवेत सामावुन घेवून आवश्यक ती वेतनश्रेणी देवून कायम करण्यास मान्यता देणे बाबत.

**सुचकः**- आनंद शंकरराव चव्हाण **अनुमोदकः**- डॉ.विश्वासराव कदम

**प्रशासकिय टिप्पणी**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या माध्यमिक शाळा (मराठी/उर्दु) माध्यमासाठी कंत्राटी पध्दतीने एकत्रीत वेतनावर माध्यमिक शिक्षक भरण्यासाठी दैनिक वर्तमानपत्रात जाहीरात मराठी माध्यमासाठी 5 शिक्षक व उर्दु माध्यमासाठी 5 शिक्षकांची देवुन पात्र व इच्छुक उमेदवारांची लेखी परिक्षा व तोंडी मुलाखतीत गुणानुक्रमे पात्र ठरलेल्या उमेदवारांची मराठी माध्यमासाठी 4 शिक्षक व उर्दु माध्यमासाठी 4 शिक्षकांची निवड समितीने निवड केल्यानुसार सदरील चार शिक्षकांची कंत्राटी माध्यमिक शिक्षक म्हणुन कार्यालयीन आदेश दिनांक 26.05.2011, 24.08.11, 10.05.11 व 20.07.2013 अन्वये प्रथम सहा महिण्यासाठी नियुक्ती करण्यात आली होती प्रत्येक सहा महिण्याच्या कालावधी नंतर वरील सर्व शिक्षकांना एक दिवसाचा तांत्रीक खंड देवुन मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

करिता कंत्राटी प्राथमिक माध्यमिक शिक्षकांना इतर महानगरपालिकेत सामावुन घेण्यात आले आहे किंवा कसे या बाबत कार्यालयीन पत्र क्रं. नावाशमनपा/ आस्था-सेल/22035/2015 दि. 17.03.2015 अन्वये माहिती मागविण्यात आली असून ती प्राप्त झाल्यानंतर शासन निर्णयातील तरतुदी नुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल

**श्रध्दा चव्हाण** कंत्राटी शिक्षकांना १० मे २०१४ ला तीन वर्ष पुर्ण झालेली असल्यामूळै शासन निर्णयाप्रमाणे या शिक्षकांना नियमित वेतनश्रेणीत कायम करण्यात यावे. कारण कत्राटी शिक्षका असे पद नसल्यामूळे कंत्राटी शिक्षक हा शब्द लागू होत नाही. त्यांना शिक्षक सेवक म्हणून संबोधून त्यांना दर सहा महिण्याला एक दिवसाचा तांत्रिक खंड देण्यात आलेला आहे तो रध्द करण्यात यावा.त्यांनी नियमित सेवा केलेली असून उपस्थितीपटावर नियमिती स्वाक्ष-या केलेल्या असल्यामूळे त्याची सेवा सलग तीन वर्षाची समजण्यात यावी .

**आनंद चव्हाण** महानगरपालिका अस्थापनेवर सध्या ९ शिक्षकाच्या जागा रिक्त असल्यामूळे या रिक्त पदावर कार्यरत कंत्राटी शिक्षकाची नेमणूक महानगरपालिका करु शकते.याकत्राटी शिक्षकांना महानगरालिका सेवेत नियमित वेतनश्रेणीत सामावून घेतल्यास त्यांच्या पगारावर होणारा ५० टक्के खर्च शासनाकडून मिळेल व ५० टक्के खर्च महानगरपालिका फंडतून करावा लागेल. कंत्राटी तत्वावरील शिक्षकांना

अत्यल्प वेतन मिळत असल्यामूळे त्यांच्या कुटुंबियावर उपास मारीची वेळ येत आहे. .नियमानुसार या शिक्षकांचा सेवा कालावधी तीन वर्षापेक्षा अधिकचा झालेल्या असल्यामूळै त्यांना मनपा सेवेत सामावुन घेण्यात यावे आवश्यकता वाटल्यास या प्रकरणी शासनाकडून आवश्यक ते मार्गदर्शन मागविण्यात यावे.

**स.शेर अली** महानगरपालिकेच्या शिक्षण अस्थापनेव एकूण शासन मान्य पदे ८९ पदे असून त्यापैकी ७४ शिक्षकाची संच मान्यता झालेली असून सध्या ६५ शिक्षक कार्यरत आहे व सध्या ९ शिक्षकाच्या जागा रिक्त आहेत त्यामूळे

या रिक्त जागेवर ५ उर्दू व ४ मराठी माध्यमाच्या कंत्राटी प्राथमिक शिक्षकांना नेमणूक देता येईल राईट ऑफ एज्युकेशन कायद्यानुसार कंत्राटी शिक्षक हे पद नसून शिक्षण सेवक असे पद आहे त्यामूळे कंत्राटी शिक्षक या शब्दा ऐवजी शिक्षक सेवक असे संबोधण्यात यावे व त्यांना देण्यात आलेला एक दिवसाचा तांत्रिक खंड माफ करुन त्यांचा सेवा कार्यकाळ शिक्षण सेवक म्हणून गृहित धरण्यात यावा. व त्यांना रिक्त असलेल्या प्रा.शिक्षक च्या जागेवर नियमित वेतनश्रेणीत सामावुन घेण्यात यावा.

**आयुक्त** त्यावेळी शासन मान्य पद नसल्यामूळे महासभेने कंत्राटी शिक्षक घेण्यासाठी मान्यता दिली होती त्यानुसार तत्कालिन आयुक्तानी एकत्रित वेतनावर कंत्राटी शिक्षकांची नियुक्ती केल्याचे दिसुन येते. कंत्राटी शिक्षक म्हणून नेमणूक देण्यात आल्यामूळे त्यांना इतर कंत्राटी कर्मचा-याप्रमाणे नियमानुसार तांत्रिक खंड देण्यात आलेला आहे.

**सविता कंठेवाड** शिक्षकाच्या नेमणूक करण्यात याव्यात. आयुक्त साहेबांनी महानगरपालिकेच्या प्रत्येक शाळेत किती वर्ग चालतात प्रत्येक वर्गातील विद्यार्थ्याची संख्या तपासून विद्यार्थी संख्यानुसार शिक्षकाच्या व क्रिडा शिक्षकांच्या नेमणुका करावयास पाहिजे. महिला व बाल कल्याण समितीच्या सदस्यांसह मनपा प्रा.शाळा आबेडनगर शाळेस भेट दिली असता त्या शाळेत १३७ विद्यार्थ्याची संख्या होती व एकच शिक्षक शिकवित होते. एकच शिक्षक शिकवित असल्यामूळे विद्यार्थ्याची गुणवत्ता कशी वाढेल, विद्यार्थी संख्या नुसार शिक्षकांच्या नेमणूका करण्यात याव्यात.

**दिपकसिंह रावत** महानगरपालिका प्राथमिक शाळेत उर्दु माध्यमाचे व मराठी माध्यमाचे किती विद्यार्थी शिक्षण धेतात हे तपासुन त्याप्रमाणे त्या त्या माध्यमाच्या शिक्षकांची नेमणूका करणे आवश्यक आहे. शाळेत विद्यार्थ्याची संख्या कमी असेल तर शासन शिक्षकांच्या पदाना मान्यता कशी देईल. त्यामूळे विद्यार्थ्याची संख्या लक्षात घेवून नेमणूका करण्यात याव्यात. नसता शिक्षकाचे वेतनावर लागणारा पुर्ण खर्च महानगरपालिकस करावा.

**श्रध्दा चव्हाण** कुस्ती शिक्षकांना प्रतिमहा रु.७००० मानधन देण्यास मान्यता देण्यात आली परंतु ७००० मानधनावर त्यांचा उदरनिर्वाह कसा काय चालेल. कंत्राटी शिक्षक म्हणून संबोधण्यात येत आहे परंतु कंत्राटी शिक्षक असे पदच नाही.त्यांना शिक्षण सेवक म्हणावे लागेल.हे शिक्षक मागील तीन वर्षापासुन शिक्षक सेवक पदावर काम करीत असल्यामूळे त्यांना सहा सहा महिण्याला जो तांत्रिक खंड देण्यात आलेला आहे रध्द करण्यात यावा व त्यांची सलग सेवा समजून त्यांना रिक्त असलेल्या शिक्षक पदावर नियमित सेवेत सामावुन घेण्यात यावे.यामूळे त्याचे आथिक नुकसान होणार नाही. जंगमवाडी प्रा.शाळेची दुरुस्ती करण्याचे नांवाखाली ही शाळा वर्कशॉप पाण्याच्या टाकी खाली हलविण्यात आलेली आहे परंतु या ठिकाणी काही दुर्धटना झाल्यास त्यास कोण जबाबदार राहिल.जंगमवाडी परिसरातच एखादी इमारत किरायाने धेवून त्या ठिकाणी शाळा सुरु करता आली असती.परंतु कंत्राटदाराचे हित जोपासण्यासाठी पाण्याच्या टाकी खाली शाळा सुरु करण्यात आली शाळा स्थलांरीत करण्यासाठी सर्वसाधारण सभेची मान्यता का घेण्यात आलेली नाही.

**आयुक्त** शासनाने मंजुर केलेल्या पदावर नेमणूक केली असती तर त्यांना शिक्षण सेवक म्हणून संबोधण्यात आले असते शासन मान्य पद नसल्यामूळे महानगरपालिकेने कंत्राटी शिक्षक म्हणून मानधनावर घेण्यासाठी ठराव पारीत केला केला व त्याअनुषंगाने कंत्राटी शिक्षकाची प्रथम सहा महिण्याकरीता नेमणूक केली असावी व त्यांना इतर कंत्राटी कर्मचा-याप्रमाणे कंत्राटी शिक्षकांना एक दिवसाचा तांत्रिक खंड दिला असे वाटते. जर शासन मान्य मंजुर पदावर नेमणूक केली असती त्यांना कंत्राटी शिक्षक म्हणता येणार नाही.

**डॉ.करुणा जमदाडे** सभापती व उपसभापती , महिला व बाल कल्याण समिती यांच्यासह आम्ही आंबेडकगर व हैदरबाग येथील प्राथमिक शाळेस भेट दिली हैदरबाग प्रा.शाळेत चौथीपर्यत वर्ग चालतात तेथे चार शिक्षक व दोन शिपाई आढळून आले चौथीच्या वर्गातील विद्यार्थ्याना काही प्रश्न विचारले असता विद्यार्थ्याना प्रश्नाचे उत्तर देता आलेले नाही. मनपा शाळेतील विद्यार्थ्याची गुणवत्ता फारच घसरल्याचे आढळून आले. त्यामूळे विद्यार्थ्याची गुणवत्ता सुधारण्यासाठी प्रयत्न करण्यात यावे.

**स.शेर अली** हा विद्यार्थ्याचादोष नाही. शिक्षणाधिकारी व मुख्याध्यापक, शिक्षक यांचा दोष आहे.त्यांची चौकशी करुन त्याचे विरुध्द कार्यवाही करण्यात यावी.

**शफी अहेमद कुरेशी** राईट ऑफ एज्युकेशन ऍक्ट लागू करण्यात आलेला आहे या ऍक्ट नुसार शिक्षकांच्या नेमणूका करणे महानगरपालिकेस बंधनकारक आहे. उपमहापौर श्री आनंद चव्हाण यांनी शिक्षकांच्या नेमणूकीचा जो प्रस्ताव मांडला तो बरोबर आहे मागील ३-४ वर्षापासुन शिक्षकाची पदे का भरण्यात आलेली नाही. शिक्षणाधिकारी ,मुख्याध्यापक यांनी विद्यार्थ्याची गुणवत्ता वाढीसाठी काय प्रयत्न केले. गुणवत्ते बाबत विद्यार्थ्याना दोष देता येणार नाही.शिक्षणाधिकारी ,मुख्याध्यापक,वर्ग शिक्षक यांनीच विद्यार्थ्याची गुणवत्ता वाढीसाठी प्रयत्न करावयास पाहिजे.राईट ऑफ एज्युकेशन ऍक्ट अंतर्गत शासन मोठया प्रमाणात अनुदान देत आहे परंतु महानगरपालिकेला अनुदान देण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात येत नाही. शिक्षणाधिकारी यांनी

अनुदानाचे प्रस्ताव शासनास सादर करुन अनुदान मिळण्यासाठी प्रयत्न करावा. जे शिक्षकाचे पदे रिक्त आहे त्यापदावर कंत्राटी शिक्षकांना नियुक्ती देण्यात यावी.

**विरेंद्रसिंघ गाडीवाले** कंत्राटी शिक्षकांना कायम करण्याचा विचार करत असतांना इतरही कंत्राटी कर्मचा-यांचा विचार करणे आवश्यक आहे. २००७ पासून महानगरपालिकेच्या विविघ विभागात विविध पदावर एकत्रित तुटपुंज्या वेतनावर जसे रोड कारकुन, संगणक चालक, क.अभियंता,डॉक्टर्स , नर्स, परिचारीका, लॅब टेकनिशियन काम करीत असून ब-याच कर्मचा-यांचे एजबार झालेले असल्यामूळे त्यांची दुस-या कार्यालयात नौकरीची संधी गेलेली आहे,त्यामूळे महानगरपालिका कर्मचा-याचा आकृतीबंध आराखडा लवकरात लवकर तयार करुन त्यानुसार निर्माण होणा-या नविन पदावर व सध्या रिक्त असलेल्या पदावर या कंत्राटी तत्वावर काम करीत असलेल्या कर्मचा-यांनाही नियमित वेतनश्रेणीत समावून घेण्यात यावे,

**सरजितसिंघ गिल** सभागृह नेत्यांनी जो प्रस्ताव मांडला त्यास माझे अनुमोदन आहे. ७-८ वर्षापासुन कंत्राटी तत्वावर कर्मचारी काम करीत आहेत त्यांना सुप्रिम कोर्टाच्या निर्णयानुसार महानगरपालिका सेवेत रिक्त असलेल्या पदावर कायम करण्यात यावे.

**महापौर** सभागृह नेते यांनी सुचविलेल्या दुरुस्तीसह स. सदस्यांच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र.१८७** **ठ रा व**

नांवामनपा शिक्षण विभागात कंत्राटी प्राथमिक शिक्षक (अर्धवेळ सेमी इंग्रजी ) पदी कार्यरत असलेले शिक्षक श्री गाडेगांवकर मारोती बालाजीराज ,मनपा प्राथमिक शाळा क्र.३ जंगमवाडी यांचा अर्धवेळ हा कालावधी पूर्ण करुन त्यांना शिक्षण सेवक (सहायक शिक्षक) म्हणून पुर्ण ग्राहय धरुन त्यांना मनपा कायम स्वरुपी सेवेत सामावून घेण्यात यावे व नियमानुसार योग्य ती वेतनश्रेणी लागू करण्यासाठी आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

नांवामनपाकेच्या शिक्षण विभागात माध्यमिक/प्राथमिक शिक्षक पदी काम करणा-या शिक्षकांचा ३ वर्षाचा कंत्राटी कालावधी पुर्ण झालेला असून त्यांचा हा कालावधी शिक्षक सेवक (सहायक शिक्षक) म्हणून ग्राहय धरुन त्यांना नियमित सेवेत सामावुन घेवून आवश्यक ती वेतनश्रेणी देवून कायम करण्यास ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या विविघ विभागात विविध पदावर एकत्रित तुटपुंज्या वेतनावर रोड कारकुन, संगणक चालक, क.अभियंता,डॉक्टर्स , नर्स, परिचारीका, लॅब टेकनिशियन यापदावर कंत्राटी तत्वावर कर्मचारी काम करीत असून त्यातील ब-याच कर्मचा-यांचे एजबार झालेले असल्यामूळे त्यांची दुस-या कार्यालयात नौकरीची संधी गेलेली आहे,त्यामूळे नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका कर्मचा-याचा आकृतीबंध आराखडा लवकरात लवकर तयार करुन त्यानुसार निर्माण होणा-या नविन पदावर व सध्या रिक्त असलेल्या पदावर या कंत्राटी कर्मचा-यांनाही नियमित वेतनश्रेणीत समावून घेण्यात यावे, असे ही नांवामनपा सर्वसाधारणसभा सर्वानुमते संमत करते. नियमानुसार आयुक्तंनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**आनंद चव्हाण** एटूझेड कंपनीकडून विविध कारणे सांगून वर्षात 10 -15 वेळा स्वच्छतेचे काम बंद ठेवीत आहे. ऐन दिपावलीच्या रमजानच्या काळात तीन दिवस सफाईचे काम बंद होते.सध्या शहरात सर्वत्र घाणीचे साम्राज्य पसरलेले असून जागोजागी कच-याचे ढिग जमा झालेले आहे नाल्या तुंबलेल्या आहेत.महानरगपालिकेने स्वच्छतेच्या कामाकरीता एटुझेड कंपनीला कंत्राट देण्यात आलेले असून याकंपनीकडून शहर स्वच्छतेचे काम योग्य प्रकारे होत नसल्यामूळे या कंपनीचे काम काढून घेवून दुस-या कत्रांटदारास काम देण्यासाठी मागील एक वर्षापासुन स.सदस्य मागणी करीत आहेत परंतु अद्याप या कंपनीकडून साफसफाईचे काम काढून घेण्यात आलेले नाही,कंत्राटदार व महानगरपालिकेचे अधिकारी संगनमताने भ्रष्टाचार करीत असल्याच्या तक्रारी स. सदस्यानी केलेल्या आहेत, आयुक्तांनी याप्रकरणाची सविस्तर चोकशी करुन .त्याचे विरुध्द दंडात्मक कार्यवाही करावी, तुप्पा येथील घनकचरा प्रकल्पाचे काम पुर्ण न केल्यामूळे एटूझेड कंपनीला ब्लॅकलिस्ट मध्ये टाकलेले आहे आणि याच कंपनीकडून आपण शहरातील साफसफाईचे काम करुन घेत आहोत एटूझेठ कंपनीकडून साफसफाईचे काम काढून घेवून त्यांना ब्लकलिस्ट मध्ये टाकण्यात यावे एटूझेड कंपनीला ब्लक साफसफाईचे कंत्राट त्वरीत रध्द करुन करण्यात यावे.व या कामासाठी नव्याने अल्प कालावधीचा (शार्ट टेंडर ) निविदा काढुन दुस-या कंत्राटदारास नेमण्यात यावे असा माझा प्रस्ताव आहे.

**विनय पाटील** ऐटूझेड कंपनीकडून होत असलेल्या कामाचे संदर्भात वारंवार सर्वसाधारण सभेत व स्थायी समितीच्या सभेत स.सदस्यांनी एटुझेड कंपनीस ब्लॅकलिस्ट मध्ये टाकून कंत्राट रध्द करण्याची मागणी केलेली आहे परंतु आजपर्यत एटूझेड कपनीविरुध्द कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नाही. त्याचे कंत्राटही रध्द करण्यात आलेले नाही. एटूझेडच्या सफाईच्या कामावर प्रशासनाचा कोणताच अंकूश नाही उपमहापौर यांनी जो प्रस्ताव मांडला त्यास माझे अनुमोदन आहे.

**सरजितसिंघ गिल** तुप्पा येथे घनकच-यापासून खत निमिर्ती प्रकल्पाचे काम एट्रूझेडलाच देण्यात आले होते या कंपनीने विहित कालावधीत काम पुर्ण न केल्यामूळे स्थायी समितीने या कंपनी ब्लॅकलिस्ट मध्ये टाकलेले आहे व त्याच कंपनीकडून आपण साफसफाईचे काम करुन घेत आहोत ही दूर्दैवी बाब आहे.एट्रूझेड कंपनीची त्वरीत हकाल पटी करुन नविन कंत्राटदाराची नियुक्ती त्वरीत करण्यात यावी.

**महापौर** उपमहापौर यांनी मांडलेल्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र.१८८** **ठ रा व**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेने शहरातील रस्त्यांची साफसफाई करणे, नाल्यांची साफसफाई करणे, व घरोघरी जावून कचरा जमा करणे व जमा झालेला सर्व कचरा उचलून तुप्पा येथील घनकचरा प्रकल्पामध्ये टाकणे या कामाकरीता एट्रूझेड इनफ्रास्ट्रक्चर लि. या कंपनीस कंत्राट दिलेले आहे. ही कंपनी विविध कारणे सांगून वर्षात 10 -15 वेळा स्वच्छतेचे काम बंद ठेवीत आहे.ऐन दिपावलीच्या रमजानच्या काळात तीन दिवस सफाईचे काम बंद होते.सध्या शहरात सर्वत्र घाणीचे साम्राज्य पसरलेले असून जागोजागी कच-याचे ढिग जमा झालेले आहे नाल्या तुंबलेल्या आहेत.यामूळे नागरीकांच्या आरोग्यास धोका निर्माण झालेला आहे. महानरगपालिकेने स्वच्छतेच्या कामाकरीता कंत्राट दिलेली ही कंपनी शहर स्वच्छतेचे काम योग्य प्रकारे करीत नसल्यामूळे या कंपनीचे काम काढून घेवून दुस-या कत्रांटदारास काम देण्यासाठी मागील एक वर्षापासुन स.सदस्य मागणी करीत आहेत परंतु अद्याप या कंपनीकडून साफसफाईचे काम काढून घेण्यात आलेले नाही, कंत्राटदार व महानगरपालिकेचे अधिकारी संगनमताने भ्रष्टाचार करीत असल्याच्या तक्रारी स. सदस्यानी केलेल्या आहेत, तुप्पा येथील घनकचरा प्रकल्पाचे काम पुर्ण न केल्यामूळे स्थायी समितीने ठराव क्र. १७४ दि.१०.१.२०१४ अन्वये एट्रूझेड कंपनीला ब्लॅकलिस्ट मध्ये टाकलेले आहे असे असतांना याच कंपनीकडून महानगरपालिका शहरातील साफसफाईचे काम करुन घेत आहे. .करीता एट्रूझेड कंपनीकडून त्वरीत उपरोक्त साफसफाईचे काम काढून घेवून त्यांना ब्लॅकलिस्ट मध्ये टाकण्यात यावे असे ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते संमत करते तसेच एटुझेड कंपनीचे साफसफाईचे कंत्राट त्वरीत रद्द करुन या कामासाठी नव्याने अल्प कालावधीची (शार्ट टर्म टेन्डर ) निविदा काढुन कंत्राटदार नेमण्यात यावे असे ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते संमत करते. व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**विषय क्र.१३** **प्रस्ताव**

नांवामनपा मंजुर सुधारीत विकास आराखडयातील आरक्षण क्र.५-ए, ९-ए, १० व ११-ए हे विकसित करण्यासाठी सदरील जागेचे भू संपादन करण्यासाठी लागणा-या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे बाबत.

**सुचकः-** सौ.अंजली सुरेश गायकवाड **अनुमोदकः-** बाळासाहेब गंगाधरराव देशमूख,(सं.पा.)

**प्रशासकीय अभिप्राय**

स.सदस्यांनी ठेवलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने नांदेड शहराच्या मंजुर विकास योजनेनुसार आरक्षणाची स्थिती खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | आरक्षण नं. | आरक्षणाचे नांव | अंदाजित क्षेत्रफळ हेक्टर | आरक्षण विकासासाठी समुचित प्राधिकरण |
|---|---|---|---|---|
| १ | A-5 | भाजी बाजार आणि दुकान केद्रे | ०.३४ | महानगरपालिका नांदेड |
| २ | A-9 | वस्तीगृह | ०.३६ | Social welfare department |
| ३ | A-10 | दवाखाना | ०.४७ | महानगरपालिका, नांदेड |
| ४ | A-11 | वाचनालय | ०.१२ | महानगरपालिका ,नांदेड |

आरक्षणाचे खालील पध्दतीने जमिनीचे संपादन /विकास करता येवू शकले

१) मंजुर सुधारीत विकास नियंत्रण निमयावली नियम क्र. Appendix “C” नियम क्र.८१ (V) नुसार समावेषक आरक्षणा अंतर्गत जागेचा विकास करता येइल व ते खालील प्रमाणे आहे.

**आरक्षण क्र. A-5 दुकान केंद्र** :- मनपा यांनी ठरविलेल्या मापदंडानुसार दुकानाचे प्रकार, क्रमांक व आकार यानुसार जमिन मालक जागेचा विकास करु शकेल.

**किंवा**

जमिन मालक जागेच्या बांधकामाच्या १५ टक्के बांधकामाचे क्षेत्र समुचित प्राधिकरणास विनामुल्य हस्तांतरीत केल्यास जमीन मालकास पुर्ण जागेच्या क्षेत्रफळाच्या चटई क्षेत्र सोबतच्या लागू असलेल्या विभागानुसार वापरा प्रमाणे या आरक्षणाचा देखील विकास करता येईल.

**आरक्षण क्र. A-5 भाजी बाजार** :- मनपा जागेचे संपादन करुन जागेचा विकास भाजी मंडीसाठी करु शकते.

**किंवा**

जमिन मालकाने जागेच्या २५ टक्के खुली जागा समुचित प्राधिकरणास विनामुल्य हस्तांतरीत केल्यास जमीन मालकास पुर्ण जागेच्या क्षेत्रफळाच्या चटई क्षेत्र सोबतच्या लागू असलेल्या विभागानुसार वापरा प्रमाणे या आरक्षणाचा देखील विकास करता येईल. जागेवर

**आरक्षण क्र A-10 दवाखाना :-** मनपा जागेचे संपादन करुन जागेचा विकास आरक्षणचा करु शकते.

किंवा

जमिन मालकाने आयुक्त ,मनपाने ठरविलेल्या निकषानुसार १५ टक्के बांधकामाचे क्षेत्र विनामुल्य समुचित प्राधिकरणास हस्तांतरीत केल्यास आयुक्त हे अर्जदारस त्यांच्या मोबदल्यात पुर्ण जागेचा चटई क्षेत्र सभोवतालच्या वापराप्रमाणे जमिन मालक याआरक्षणाचे क्षेत्राचा देखील विकास करु शकतो.

**आरक्षण क्र A**-11 **वाचनालय**:- समुचित प्राधिकरण जागा भुसंपादन करुन आरक्षणाचा विकास व देखभाल करु शकेल.

किंवा

आयुक्त ,मनपाने ठरविलेल्या निकषानुसार २० टक्के बांधकामाचे क्षेत्र विनामुल्य समुचित प्राधिकरणास विनामुल्य हस्तांतरीत केल्यास आयुक्त हे अर्जदारस त्यांच्या मोबदल्यात पुर्ण जागेचा चटई क्षेत्र सभोवतालच्या वापराप्रमाणे जमिन मालक याआरक्षणाचे क्षेत्राचा देखील विकास करु शकतो.

२) जागेचा मोबदल्यात जमिन मालकास TDR प्रमाणपत्र देईल त्याबाबत जागा विनामूल्य मनपास हस्तांतरीत करुन द्यावयाची आहे.

३) आरक्षणा खालील जमिनीचे खाजगी वाटाघाटीने संपादन करता येईल त्यासाठी शासकीय शिघ्र सिध्द (आरआर) दरानुसार जमिन मालकाच्या संमतीने जागा ताब्यात धेता येईल.

वरील प्रमाणे जमिन मालकास प्रस्ताव मान्य नसल्यास भुसंपादन अधिनियमा अंतर्गत जागेच्या भुसंपादनाचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, नांदेड यांचेकडे पाठवावा लागेल. त्यासाठी लागणारा खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यासाठी प्रस्ताव सादर.

**महापौर** आयुक्तानी दिलेल्या अभिप्रायानुसार महानगरपालिकेच्या जे हिताचे असेल त्याप्रमाणे भूसंपादन करण्याचे पुर्ण अधिकार आयुक्त , नांवामनपा नांदेड यांना देण्यात येताता नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी. व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र.१८९** **ठ रा व**

नांवामनपा मंजुर सुधारीत विकास आराखडयातील आरक्षण क्र.५-ए, ९-ए, १० व ११-ए हे विकसित करण्यासाठी सदरील जागेचे भू संपादन हे आयुक्तानी दिलेल्या अभिप्रायानुसार महानगरपालिकेच्या जे हिताचे असेल त्याप्रमाणे भूसंपादन करण्याचे पुर्ण अधिकार आयुक्त , नांवामनपा नांदेड यांना ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते देते तसेच भुसंपादनासाठी लागणा-या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते देते. व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्र.१४** **प्रस्ताव**

रोड नं.३५ लालवाडी चौरस्ता ते लालवाडी अंडरब्रिज पर्यतचा रस्ता अतिक्रमीन बांधवांना साईट नं.३४ मध्ये घरे द्यावे व अभिन्यासाप्रमाणे रोड मोठा करुन मुख्य रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्यासाठी व रस्त्याच्या एका बाजून पादचा-याकरीता स्वतंत्र फुटपाथ रस्ता करण्यासाठी लागणा-या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे बाबत.

**सुचकः**- सौ.अंजली सुरेश गायकवाड **अनुमोदकः**- बाळासाहेब गंगाधरराव देशमूख,(सं.पा.)

**महापौर** स.सदस्यांचा प्रस्ताव मंजुर करण्यात येतो.व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**ठराव क्र.१९०** **ठ रा व**

रोड नं.३५ लालवाडी चौरस्ता ते लालवाडी अंडरब्रिज पर्यतचा रस्ता अतिक्रमीन बांधवांना साईट नं.३४ मध्ये घरे द्यावे व अभिन्यासाप्रमाणे रोड मोठा करुन मुख्य रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्यासाठी व रस्त्याच्या एका बाजूने पादचा-याकरीता स्वतंत्र फुटपाथ रस्ता करण्यासाठी लागणा-या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते देते .व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्र.१५** **प्रस्ताव**

नांवामनपा हदीतील खालील गरीब गरजु व होतकरु नागरीकांना राष्ट्रीय कालाकार (प्रबोधनकार) यांना बिएसयुपी योजने अंतर्गत घरकुलाचा लाभ देण्याबाबत हि सर्वसाधारणा सभा सर्वानुमते मंजुरी देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

१) शाहीर रमेश किशन गिरी (राष्ट्रीय शाहीर व समाज प्रबोधनकार)
२) गंगासागर रामचंद्र वाघमारे ( अंध गायिका व शाहीरी कलाकार)
३) मधुकर हिरामण घोगरे (गरीब व होतकरु किर्तनकार)
४) धर्माजी हिरामण ऐतननगरकर (गरीब होतकरु)
५) शांताबाई सदाशिव ऐतननगरकर ( गरीब होतकरु)
६) सोनल भागवत पारडकर (गरीब होतकरु )
७) विश्वनाथ रामराव कदम (गरीब होतकरु)

**सुचकः**- डॉ.करुणा जमदाडे **अनुमोदकः**- रजियाबेगम अयुब खान

## प्रशासकीय अभिप्राय

बिएसयुपी योजना ही गलिच्छ वस्तीतील व झोपडपटी मध्ये राहणा-या नागरी गरीबांना पक्के घरे व मुलभूत सुविधा उपलब्ध्द करुन देण्याची योजना असून बेघरांना घरकुले अथवा गरजु होत करुना धरकुल देणे अशी योजना सध्या अस्तित्वात नाही. त्यामूळे प्रस्तावातील व्यक्तींना बिएसयुपी योजने अंतर्गत घरकुले उपलबध्द करुन देता येणार नाही.

**डॉ.करुणा जमदाडे** — शहरातील विविध गरीब व होतकरु कलाकार आहेत ते समाज प्रबोधनाचे व लोकसेवेचे मनोरंजानाचे काम काम करतात त्यांना राहण्यासाठी घरे नसल्यामूळे त्यांना बिसयुपी योजने अंतर्गत घरे देण्याचा प्रस्ताव मी मांडला आहे त्यास सभागृहाने मान्यता द्यावी अशी विनंती आहे.

**सरजितसिंघ गिल** — स्थानिक वृत्तापत्रात जाहिरात देवून शहरातील सर्व कलाकाराकडून अर्ज मागविण्यात यावे व प्राप्त झालेल्या अर्जानुसार घर देण्याचा निर्णय घेण्यात यावा.

**रजिया बेगम** — माझ्या प्रभागातील आंबेडकर नगरातील नागरीक बिएसयुपी योजने अंतर्गत घर मिळण्यासाठी महानगरपालिका कार्यालयासमोर उपोषणास बसले होते त्यावेळी त्यांना घरे देण्याचे आश्वासन देण्यात आले होते परंतु अद्याप त्यांना घरे देण्यात आलेली नाही.

**आयुक्त** — केंद्र शासनाने जेएनएनयुआरएम योजना लागू केली त्याच बरोबर झोपडीमुक्त शहर करण्यासाठी बिएसयुपी म्हणजे शहरी नागरीकासाठी मुलभूत सुख सुविधा योजना मंजुर केली आहे यामध्ये दोन भाग आहे.आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील व इतर मागासवर्गीय नागरीक ज्या झोपडपटी भागात झोपडी टाकुन व कच्चे टिनशेडचे घरात राहतात त्यांना घरे बांधून देणे आणि त्या परिसात मुलभूत सुविधा रस्ते, रोड, नाल्या, दिवाबत्ती ,पाणी पुरवठा व मलनिस्सारण अशा मुलभूत नागरी सुविधा उपल्ध्द करुन देणे अशी ही केंद्र शासनाची योजना असल्यामूळे शहरातील इतर कोणत्याही नागरीकांना बिएसयुपीची घरे वाटप करता येत नाही. शहरातील कलाकांराना घरे द्यावयाची झाल्यास तसा ठराव पारीत झाल्यास शासनास ठराव सादर करुन शासनाचे मार्गदर्शनाप्रमाणे त्यावर निर्णय घेण्यात येईल.

**उमेशसिंह चव्हाण** — केंद्र शासनाचे झोपडपटी मुक्त शहर करण्याचे धोरण आहे.केंद्र शासनाने बिएसयुपी योजने अंतर्गत चालू असलेली कामे बंद करुन देण्यात आलेला निधी परत करावा असे केंद्र शासनाने कळविलेले आहे काय एनटिसी मिलची जागा ताब्यात नसतांनाही कंत्राटदारास कामाचे आदेश देवून त्यांना अग्रीम रक्कम देण्यात आली व त्यांना देण्यात आलेल्या अग्रीम रक्कमेवरील व्याज माफ करण्यात आलेले आहे. नोव्हेंबर २०१४ पर्यत ज्यांनी पैसे भरलेले त्यांचे घराचे बाधंकाम करण्यात येतील व त्यानंतर पैसे भरलेल्या लाभार्थ्यांना घराचे बांधकाम करुन देण्यात येणार नाही असे सांगण्यात येत आहे. नोव्हेंबर २०१४ नंतर अनेक लाभार्थ्यांनी आपला घराचा वाटा भरलेला आहे पैसे भरल्याच्या पावत्या त्यांच्याकडे आहे हे पैसे कोणाच्या आदेशानुसार भरुन घेण्यात आले.यादीत लाभार्थ्यांचे नावे असो वा नसो त्यांना घरे मिळाली पाहिजे.एका एका घरात दोन दोन कुंटुंबे राहतात त्यांनाही तळ मजला व पहिला माळा जी प्लॅस वन या प्रमाणे घराचे बांधकामासाठी परवानगी देण्यात यावी.

**दिपकसिंह रावत** — एकाच घरात दोन भावु राहतात व त्यांनी नियमाप्रमाणे पैसे भरलेले असतील तर त्यांचे वाटणी पत्राचे आधारे तळमजल्यावर एक व वरच्या मजल्यावर एक घर बांधून देण्यासाठी परवानगी देण्यात यावी.अपिल कंपनी महानगरपालिकेची मालक नाही ती फक्त सल्लागार म्हणून काम करते.अपिल सल्लागार चुकीचे मार्गदर्शन करुन लार्भायांना व अधिका-यांना परेशान करीत आहे. अपिल
कन्स.कंपनीचे काम रध्द करुन महानगरपालिकेच्या सक्षम अभियंत्याकडून ही कामे करुन घेण्यात यावी.

**विनय पाटील** — महानगरपालिकेने अपिल कन्स.कंपनीला कार्यालये दिले,गाडया दिल्या नियमाप्रमाणे या सुविधा अपिल कन्स.ला देता येते काय याचा खुलासा करण्यात यावा.

**अशोक उमरेकर** — मी स्थायी समितीची सदस्य असतांना अपिल कन्स.कंपनीचे काम रध्द करुन हे काम सुशिक्षीत बेकार अभियंत्याकडून करुन घ्यावे. म्हणजे महानगरपालिकेची आर्थिक बचत होईल व हे अभियंते महानगरपालिकेच्या अधिनस्त काम करतील असा प्रस्ताव मी मांडला होतो परंतु त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले आहे.

**अंजली गायकवाड** — आमचे प्रभागातील नई आबादी,आंबेडकनगर,श्रावस्तीनगर,लालवाडी याभागातील बिएसयुपीची मुलभूत नागरी सुविधांची कामे बंद पडलेली आहे.लाभार्थ्यांनी २००८ पासून ते आज पर्यत बिएसयुपीचया धरासाठी पैसे भरलेले आहे त्यामूळे त्यांना घरे देण्यात यावी. काही भागात घराचे बांधकाम पुर्ण करण्यात आले परतु त्यांना मुलभूत नागरी सुविधा पुरविण्यात आलेल्या नाहीत. पाणी पुरवठा ,मलनिस्सारण ,रस्ते ,नाल्या,ई.व्यवस्था करण्यात आलेली नाही नागरीकांच्या समस्या तश्याच कायम आहे ही अतषिय गंभिर बाब आहे .नागरीकांची फसवणूक करण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| **उमेश चव्हाण** | नई आबादी भागात बिएसयुपी योजनेचे काम थांबलेले आहे त्या भागात कामे करण्यासाठी परवानगी देण्यात यावी. बिएसयुपी योजने अंतर्गत शहरातील सर्व कामे पुर्ण करण्यासाठी सर्व अभियंत्यांना डेडलाईन देण्यात यावी. काही लाभार्थ्यांना स्वत: घराचे बांधकाम करण्यासाठी परवानगी मागीतली आहे त्यांना बांधकामाची परवानगी देण्यात यावी. |
| **सरजितसिंघ गिल** | बिएसयुपी अंतर्गत स.सदस्यांनी ज्या सुचना केल्या आहेत त्याची अमलबजावणी करण्यात यावी. बिएसयुपीची कोणतीही कामे बंद करण्यात येवू नये. लाभार्थ्यांनी पैसे भरलेले आहे. तत्कालिन आयुक्त श्री निपुन विनायक यांनी अपिल कन्स.कंपनीला हाकलले होते त्यानंतरच्या अपिल कन्स.कंपनी बिगर मंजुरीने काम करीत आहे.कार्यालयाचा महानगरपालिकेच्या गाडयाचा वापर करीत आहेत.अपिल कन्स.हाकलून द्यावे. महानगरपालिकेच्या अभियंत्याकडून कामे करुन घेण्यात यावी एक वर्षाची मुदत असतांना तीन वर्षापासुन काम करीत आहे.व चुकीचे रिपोर्ट देत आहेत.त्याची चौकशी करण्यात यावी. |
| **स.जानी** | लेबर कॉलनीची घरकुल योजना ही १९५४ ची आहे. या ठिकाणी बिएसयुपी योजने अंतर्गत घराचे बांधकाम व्हावे म्हणून या भागाचा सर्व्हे करण्याची मागणी आयुक्ताकडे दिड वर्षापुवी केली होती व १००-१५० लाभार्थ्यांची यादी दिली होती परंतु आज पर्यत प्रशासनाकडून सर्वसाधारणसभेत प्रस्ताव आलेला नाही. करीता लेबरकॉलनी भागात १०० ते १५० लाभार्थ्यांना बिएसयुपी योजने अंतर्गत घराचे बाधकाम करुन देण्यात यावे. |
| **आयुक्त** | मंजुर असलेल्या लाभार्थ्यांचे यादी प्रमाणे लाभार्थ्यांचे घराचे बांधकाम करण्यात येत असून बांधकाम करण्यात येत असलेल्या झोपडपटी भागात मुलभूत नागरी सुविधा उपलब्ध्द करुन देण्यासाठी शासनाने मंजुर असलेल्या डिपीआर प्रमाणे कामे पुर्ण करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. त्यामूळे निधी परत जाण्याचा प्रश्नच उदभवत नाही. |
| **उमेशसिंह चव्हाण** | पैसे वापस जात नसतांना बिएसयुपीची कामे का बंद करण्यात येत आहे. |
| **गफार खान** | बिएसयुपीच्या कामाचा आढावा घेण्यासाठी विशेष सभा घेण्यात यावी. |
| **आयुक्त** | बिएसयुपी योजने अंतर्गत घराचे बांधकामासाठी खुल्या प्रवर्गातील नागरीकांनी आपला हिश्याचा १२ टक्के वाटा व मागासवर्गीय प्रवर्गातील नागरीकांनी आपला १० वाटा भरणे आवश्य आहे.बीएसयुपी विभागास एकूण मंजुर घराची संख्या ,पुर्ण झालेल्या घराची संख्या, अर्धवट घराची संख्या ,मार्कआवूट दिलेल्या घराची संख्या, मार्क आवूट दिलेल्या घराची संख्या ,मार्क आवूट न दिलेल्या घराची संख्या,स्वत बांधकाम करण्यासाठी देण्यात आलेली एकूण परवानग्या, वाटा भरलेल्या लाभार्थ्यांची संख्या व वाटा न भरलेल्या लाभार्थ्यांची सख्या अशा प्रकारचे वेगवेगळे तक्त तयार करण्याचे आदेशित केलेले असून प्रभाग निहाय सर्व माहिती संकलित करुन ती स.सदस्यांना देण्यात येईल.डिपीआर १ ते ११ मध्ये बांधकाम नियमाचे अटी शर्तीस अधिन राहुन विविध झोपडपटी भागात २८००-२९०० लाभार्थ्यांना स्वत: घराचे बांधकाम करण्यासाठी परवानगी देण्यात आलेली आहे. एकाच घरात दोन पेक्षा अधिक कुटुंबे राहतात अशा लाभार्थ्यांना वरच्या मजल्याचे बांधकाम करण्यास परवानगी देता येते किंवा कसे याबाबत माहिती घेवून पुढील सभेत माहिती देण्यात येईल. |
| **उमेश चव्हाण** | संबंधित कुंटुंबियाच्या वाटणीपत्राचे आधारे जी प्लस १ ची परवानगी देण्यात यावी. |
| **किशोर भवरे** | श्री उमेश चव्हाण यांनी जो प्रस्ताव मांडला त्यास माझे अनुमोदन आहे. |
| **आयुक्त** | बिएसयुपी योजना ही केंद्र शासनाची योजना असून पैसा केंद्र शासनाचा आहे. केंद्र शासनाचे जे नियम आहेत त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल. |
| **महापौर** | स.सदस्यांच्या प्रस्तावर जो प्रशासकीय अभिप्राय देण्यात आला त्यानुसार प्रस्ताव ना मंजुर करण्यात येतो. |

**ठराव क्र.१९१** **ठ रा व**

नांवामनपा हदीतील खालील गरीब गरजु व होतकरु नागरीकांना राष्ट्रीय कलाकार (प्रबोधनकार) यांना बिएसयुपी योजने अंतर्गत घरकुलाचा लाभ देण्याबाबत सदस्यांनी सादर केलेला प्रस्ताव प्रशासकीय अभिप्रायानुसार ना मंजुर करण्यात येतो.

**विषय क्र.१६** **प्रस्ताव**

कर्मचा-यांच्या अस्थापना विषयी बाबी बाबत मा.आयुक्त यांच्या वतीने मा.उच्च न्यायालय खंडपिठ औरंगाबाद येथे म.न.पा. अधिनियमातील कलम ५६(४) च्या नुसार स्थायी समिती /सर्वसाधारण सभा अपिलीय प्राधिकारी आहेत,असे विविध कर्मचा-याच्या न्याय प्रविष्ट प्रकरणात प्रतिज्ञापत्र देण्यात आले व तसे महानगरपालिकेच्या कायदेसल्लागार मार्फत मा.उच्च न्यायालयाचे निर्देशनास आणुन देण्यात आले आहे.

महानगरपालिका स्थायीसमितीने अधिनियमातील प्राप्त अधिकारानूसार कर्मचा-यांच्या अस्थापना विषयक बाबीमधे अपिलात नियमानुसार ठरावाव्दारे निर्णय दिल्यानंतर अपिल प्राधिका-यांच्या दिलेला आदेश ताबडतोब अमलात येईल व तो निर्णायक असेल अशी

अधिनियमात तरतुद असतानां प्रशासनातर्फे अधिनियमातील कलम ४५१ नुसार अपिलीय प्राधिकारी म्हणून घेतलेला ठराव प्रशासनातर्फे शासनाकडे विखंडीत करण्यासाठी पाठविण्यात आले आहेत व येत आहेत.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५१ मध्ये कर्मचा-यांच्या अस्थापना विषयक बाबी बाबत स्थायी समिती/सर्वसाधारण सभा अपिलीय प्राधिकारी म्हणून नियमानुसार संमत केलेला ठराव विखंडीत करण्याची तरतूद येत नाही.

महानगरपालिका स्थायी समिती /सर्वसाधारण सभा अपिलीय प्राधिकारी म्हणून नियमानुसार घेतलेला ठराव अधिनियमातील कलम ४५१ मधील तरतूदी व्यतिरिक्त महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कोणत्या तरतूदीखाली शासनास पाठविण्यात आले व येत आहेत त्याबाबत सविस्तर माहिती देवून चर्चा करुन निर्णय घेणे बाबत हि सर्वसाधारण सभा सर्वानुमते संमत करते.

**सुचकः-** आनंद शंकरराव चव्हाण **अनुमोदकः-** स.विरेंद्रसिंघ गाडीवाले

**उमेशसिंह चव्हाण** आयुक्तांनी एखाद्या अधिका-यावर कर्मचा-यावर शिक्षा लादली असेल तर सबंधितांना महानगरपालिका अधिनियमातील कलम ५६ (४) नुसार त्या शिक्षेविरुध्द स्थायी समिती ,सर्वसाधारण सभेकडे अपिल अधिकार असून स्थायी समितीस सर्वसाधारण सभेस शिक्षे मध्ये बदल करण्याचा किंवा रध्द करण्याचा अधिकार आहे असे असतांना स्थायी समितीचे सर्वसाधारण सभेचे असे ठराव शासनास विखडीत करण्यासाठी का पाठविण्यात येत आहेत याचा खुंलासा करण्यात यावा.

**उपआयुक्त प्रशासन** मागील दोन वर्षात स्थायी समिती/महासभेने शास्ती माफ करण्याच्या १० प्रकरणात निर्णय घेतलेले आहे. त्यापैकी १)श्री अतिक अन्सारी स्वच्छता निरिक्षक यांना विनापरवानगी मुख्यालय सोडणे, कामात निष्काळजीपणा करणे, रजा उपभोगून रजा सादर करणे या कारणामूळे २ वार्षिक वेतनवाढी गोठविण्यात आल्या होत्या स्थायी समितीने ठ.क्र.४९ दि.३०.६.२०१३ अन्वये शास्ती माफ करण्याचा निर्णय घेतला. प्रस्तुत प्रकरणात संबंधितावर ठेवण्यत आलेले दोषोरोप सिध्द झाल्यामूळे लादण्यात आलेली शास्ती रध्द करणे योग्य होणार नाही त्या अनुषंगाने सदर ठराव शासनास विखंडीत करण्यासाठी पाठविण्यात आला.२) श्री संघरत्न सोनसळे, उपअभियंता कंत्राटी यांना मनपा सेवेत ठेवण्यो हिताचे नसल्यामूळे त्यांना उपअभियंता यापदावरुन कायमचे कमी करण्यात आले स्थायी समितीने त्यांना पुर्ववत रुजू करण्याचा निर्णय घेतला होता. प्रस्तूत प्रकरणात संबंधित हे दोषी आढळल्यामूळै लादण्यात आलेली शास्ती रध्द करणे योग्य होणार नाही त्या अनुषंगाने सदर शासनास विखंडीत करण्यासाठी पाठविण्यात आला. ३) श्री मुस्तफा बंदे अली ,लिपक, यांनी सोनोग्राफ सेटर जैनेटिक लॅब ,जैनेटिक कॉन्सीलींग सेंटर धारकाकडून नोंदणी व नुतनीकरणाची वसुंल केलेली रक्कम मनपा फंडात जमान केलेली नवसल्यामूळे संबंधितास मनपा सेवेत ठेवणे हिताचे नसल्यामूळे तसेच चौकशी अंती दोषी अस्ल्याचे सिध्द झाल्यामूळे संबंधितास मनपा सेवेतून कमी करण्यात आले.मनपा स्थायी समितीने व सर्वसाधारण सभेने संबंधीताच्या दोन वार्षीक वेतनवाढी कायम स्वरुपी बंद करुन त्यांना पुर्ववत मनपा सेवेत पुनस्थापित करण्याचा निर्णय घेतला. संबंधिता विरुध्द न्यायालयात दोषारोप दाखल करण्यास परवानगी देण्यात आलेली असून मनपा ठराव क्र.१६३ दि.२४.१.२०१३ व स्थायी समिती ठराव क्र.१०८ दि.१.१२.२०१४ हे दोन्ही ठराव शासनाकडे विखंडीत करण्यासाठी प्रस्ताव पाठविण्याची कार्यवाही सुरु आहे. ४) मनपाने ट्राफीक वार्डन यांना मानधनावर नेमणूक दिली होती.परंतू महानरगरपालिकेकडे त्यांच्या कामावर नियंत्राण ठेवण्यासाठी कोणतीही यंत्रणा नसल्यामूळै त्यांना कमी करण्यात आले, सर्वसाधारण सभेने ठराव क्र.१७७ दि.१५.३.२०१२ अन्वये त्यांना कामावर घेण्याचा निर्णय घेतला . सदराचा ठराव शासनास विखंडीत करण्यासाठी सादर करण्यात आला, श्री मोहन दिगांबर मेकलवार ,लाईनमन हे ४८ तासापेक्षा जास्तीच्या कालावधीपासुन अटकेत असल्यामूळे निलंबित करण्यात आले होते चौकशी अंती ते निर्दोष असल्यामूळे स्थायी समितीने ठराव क्र.१०९ दि.२.८.२०११ अन्वये शास्ती माफ करण्याचा निर्णय घेतला त्यानुसार त्यांचा अनुपस्थिती कालावधी त्यांच्या शिल्लक अर्जित रजेत समाविष्ट करुन त्यांचा निलंबन कालावधी म्हूणन ग्राहय धरण्यात आला.श्री धनंजय रत्नपारखे ,जकात जवान,यांना वर्तनात सुधारणा होत नसल्यामूळे बडतर्फ करण्यात आले स्थायी समितीने व सर्वसाधारण सभेने त्यांना लादण्यात आलेली शिक्षा रध्द करुन पुनस्थापीत करण्याचा निर्णयघेतला या प्रकरणाची संचिका मा.आयुक्तांकडे सादर करण्यात आलेली आहे. श्री आशिर्वाद भिकु चव्हाण ,लिपिक यांना कार्यालयीन कामकाजात निष्काळजीपणा व वरिष्ठांच्या आदेशाचे पालन न करणे असे आरोप होते म्हणून १ वार्षिक वेतनवाढ कायम स्वरुपी गोठवून दि.२९.८.२०१३ ते कामावर रुजू होईपर्यतचा कालावधी हा निलंबंन काळ म्हणून गृहित धरण्यात आला, स्थायी समितीने ठराव क्र.७६ दि.६.९.२०१४ अन्वये त्यांना आपली वर्तणुक सुधारण्याची संधी देवून त्यांची रोकण्यात आलेली एक वार्षिक वेतन वाढ पुर्ववत सुरु करण्यास व त्यांचा निलंबन काळ हा त्यांच्य हक्क असलेल्या रजेत समाविष्ट करण्याचा निर्णय घेतला. आयुक्तांनी लावलेल्या शास्ती विरध्द स्थायी समितीकडे अपिल करण्याची तरतूद नसल्यामूळे स्थायी समिती निर्णयाची अमलबजावणी करा येणार नाही लावलेली शास्ती कायम ठेवण्यत येत आहे असे कळविण्यात

आले आहे. श्री अशफाक अली खान ,इमारत निरिक्षक अनाधिकृत बांधकाम प्रकरणी निष्काळजीपणा करणे तसेच अनाधिकृत बांधकामासंबधी विहित नमून्यात मागविलेली माहिती सादर न करणे असे आरोप होते चौकशी अंती त्यांचा निलंबन कालावधी हा निलंबन काळ म्हणून गृहित धरुन एक वार्षीक वेतनवाढ एका वर्षासाठी गोठविण्यत आली,स्थायी समितीने संबंधितावर लादण्यात आलेली शास्ती क्षमापित करण्याच्या संदर्भात ठराव पारीत केला आहे. स्थायी समितीच्या ठरावानुसार संबंधितावर लादण्यात आलेली शास्ती क्षमापित करण्यसाठी संचिका आयुक्तांकडे सादर करण्यात आलेली आहे. श्री विजय मोहन तोटावाड,लिपिक ,बिएसयुपी विभाग येथे वसुली लिपिक म्हणून कार्यरत असतांना बिएसयुपी घरकुल योजने अंतर्गत लाभार्थ्याकडून वसुल केलेली लोकसहभागापोटीची रक्कम रु.४,८५,५००/- अपहार करुन सदरची रक्कम कार्यालयात उशिराने भरणा केली त्यामूळे त्यांना बडतर्फ करण्यात आले. मनपा स्थायी समितीने ठराव.क्र.१०९ दि.१.१२.२०१४ अन्वये प्रशासकीय अभिप्रायाविरुध्द संबंधितास त्यांच्या दोन वार्षीक वेतनवाढी कायम स्वरुपी बदं करुन पुर्ववत मनपा सेवेत पुनस्थापित करण्यास मान्यता प्रदान केली सदरील प्रकरणात मनपा कायदे सल्लागार यांचे अभिप्रायासाठी संचिका प्रस्तावित केली आहे.या गुन्हयामध्ये दोष सिध्द त्यापैकी महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ४५१ मध्ये शासनास विखंडीत करण्यासाठी कोणते ठराव पाठवावे व कोणते ठराव पाठवू नये अशी स्पष्ट तरतूद नाही. प्रशासनामार्फत शासनाकडे ४ प्रस्ताव विखंडीत करण्यासाठी पाठविण्यात आलेले आहे.

**विनय पाटील** आयुक्तांनी कलम ४५१ खाली ठराव शासनाकडे विखंडीत करण्यासाठी पाठविण्याल्यानंतर त्याची माहिती स्थायी समितीला सर्वसाधारण सभेला देण्याचे बंधनकारक आहे किंवा नाही.जे ठराव विखंडीत करण्यासाठी पाठविण्यात येत आहे त्याची कारणे काय आहेत याचा खुलासा करण्यात यावा

**दिपकसिंह रावत** कर्मचा-यांनी शिक्षा माफी करण्यासाठी केलेल्या विनंती अर्जानुसार स्थायी समितीने शिक्षेत बदल करण्याचा निर्णय घेतल्यानंतर सदर निर्णयाचा ठराव शासनास विखंडीत करण्यासाठी पाठविण्यात येत आहे. श्री सुरेश कुलकर्णी यांचा शिक्षा माफीचा ठराव शासनास विखंडीत करण्यासाठीचा प्रस्ताव पाठविण्यात आला असता शासनाने विखंडीत करण्याचा फेटाळल्यानंतरही पुन्हा दोन वेळेस प्रस्ताव शासनास पाठविण्यात आला.हाय कोर्टानेही श्री सुरेश कुलकर्णी यांच्या बाजुने निकाल दिलेला आहे .विनाकारण कर्मचा-यांना त्रास देण्यात येत आहे.नियामान्वये स्थायी समितीला कर्मचा-यांना लादण्यात आलेल्या शिक्षेत बदल करण्याचा अधिकार असल्यामूळे असे ठराव शासनास विखंडीत करण्यासाठी पाठविण्यात येवू नये.

**डॉ.करुणा जमदाडे** महानगरपालिकेत सर्वसाधारण सभा ,स्थायी समिती हे प्राधिकरण असून त्यांना निर्णय घेण्याचे अधिकार आहे , असे असतांना स्थायी समितीने सर्वसाधारण सभेने घेतलेले शिक्षा माफीचे निर्णय शासनाकडे पाठविण्यात येत आहे.

**उपआयुक्त प्रशासन** महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ४५१ नुसार महानगरपालिकेच्या किंवा इतर कोणत्याही प्राधिकरणाच्या कोणत्याही ठरावाचे किंवा आदेशाचे कार्यान्वयन केल्याने किंवा
महानगरपालिकेकडून किंवा अशा प्राधिका-याकडून किंवा तिच्या त्यांच्या वतीने जी कोणतीही गोष्ट केली जाण्याची शक्यता आहे किंवा जी करण्यात येत असेल ती केल्याने हा अधिनियम किंवा त्या वेळी अमलात असलेला इतर कोणताही कायदा याव्दारे किंवा तदन्वये देण्यात आलेल्या अधिका-या विरुध्द किंवा मर्यादे बाहेर आहे किंवा शांततेचा भंग होण्याचा संभव आहे. किंवा लोकास किंवा व्यक्तीच्या कोणत्याही वर्गास किंवा गटास इजा किंवा त्रास होण्याचा संभव आहे किंवा लोकहिता विरुण्ध्द नगरपालिका निधीचा दुरुपयोग किंवा गैरवापर किंवा अपव्यय होण्याचा संभव आहे किंवा ते महानगरपालिकेच्या आर्थिक हिताच्या अथवा व्यापक लोकहिताच्या विरुध्द आहे असे राज्य शासनाचे मत झाल्यास असे ठराव विखंडीत करण्याचे अधिकार राज्य शासनास आहे.या कलमात शासनास विखंडीत करण्यासाठी कोणते ठराव पाठवावे व कोणते ठराव पाठवू नये अशी स्पष्ट तरतूद नाही. प्रशासनामार्फत शासनाकडे ४ प्रस्ताव विखंडीत करण्यासाठी पाठविण्यात आलेले आहे.

**विरेंद्रसिंघ गाडीवाले** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमामधील तरतूदीनूसार आयुक्तानी लादलेल्या शिक्षे विरुध्द
संबंधित कर्मचा-यांना स्थायी समिती ,महासभेकडे अपिल करण्याचा अधिकार असून कर्मचा-यांच्या अपिलावर स्थायी समिती व महासभेने घेतलेल्या निर्णयाप्रमाणे आयुक्तांनी सदर मलबजावणी करावयास पाहिजे असे वाटते. दोन दोन वर्ष होवूनही ठरावाची अमलबजावणी होत नाही. कंत्राटदारानी चुका करुनही त्याचेवर कार्यवाही न करता अभियंत्यावर कर्मचा-यांवर कार्यवाही करण्यात येत आहे.दलित वस्तीचे कामात कंत्राटदार दोषी असतांना श्री कलिम, अभियंता याचे विरुध्द निलंबनाची कार्यवाही करण्यात आलेली आहे. पुर्वीच्या आयुक्तांनी एका कर्मचा-यांस बडतर्फे केले होते माजी प्रभारी आयुक्त श्री देशपाडे यांनी सदर कर्मचा-यांचा व त्यांच्या कुटुबिंयाचा सहानुभूतीपुर्वक विचार करुन त्यां कर्मचा-यांना मनपा सेवेत पुनर्स्थापित

केलेले आहे.चतुर्थश्रेणीतील बरेचशे कर्मचा-यांना बडतर्फे केलेले असून त्यांना शिक्षेविरुध्दअपिल करण्याच्या तरतूद माहिती नसल्यामूळे त्यांनी अपिल केलेले नाही आज त्यांच्या कुटुंबियावर उपासमारीची वेळ आलेली आहे. तरी आयुक्तांनी अधिनियमातील तरतूदीनूसार स्थायी समितीने सर्वसाधारण सभेने कर्मचा-यांच्या शास्तीबाबत जे निर्णय धेतलेले आहे त्याची अमलबजावणी करावी तसेच जे ठराव विखंडीत करण्यासाठी शासनास सादर केलेले आहे किंवा करावयाचे प्रस्तावित आहेत त्याचा पुर्नर विचार करावा.

**महापौर** सार्वजनिक बांधकाम करीत असतांना या कामावर नियंत्रण ठेवणे,कामाची गुणवत्ता , हे पाहण्याची जबाबदारी कार्यकारी अभियंता, कनिष्ट अभियंता,यांची आहे किंवा नाही. कंत्राटदाराची चुक असतांना अभियंता श्री कलिम यांनाच जबाबदार धरुन विनाकारण निलंबित करण्यात आलेले आहे.

**सरजितसिंध गिल** आयुक्त श्री सुशिल खोडवेकर यांना मी सभागृहाचे वतीने धन्यवाद देतो .स. सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाना कोणत्याही जेष्ट अधिका-याची मदत न घेता अत्यंत समर्पक उत्तरे दिलेली आहे त्याचे मी अभिनंदन करतो.तत्कलिन आयुक्त श्री जी श्रीकांत यांनी स्थायी समिती सर्वसाधारण सभेची मान्यता न घेता क्षेत्रिय अधिका-याचे अनाधिकृत बांधकाम विरोधात कार्यवाही करण्याचे अधिकार काढून घेवून एकाच सहायक आयुक्तांना दिले होते व हा स्थायी समितीचा व सर्वसाधारण सभेचा अवमान होता म्हणून आम्ही त्याचे विरोधात सर्वसाधारण सभेत हक्क भंगाचा प्रस्ताव मांडला होता. तेव्हा श्री जी श्रीकांत यांनी आपली चुक कबुल केली होती.महानगरपालिकेत जवळपास २००० कर्मचारी आहेत मागील आयुक्तांनी जवळपास ५० ते ६० चतुर्थश्रेणीतील कर्मचा-यांना बडतर्फ केलेले आहे. या चतुर्थश्रेणीतील कर्मचा-यांना महानगरपालिका कायद्याचे नसल्यामूळे त्यांनी लादलेल्या शास्ती विरुध्द स्थायी समिती सर्वसाधारण सभेकडे अपिल केलेले नाही.ज्या कर्मचा-यांना सेवेतून कमी केले त्याची माहिती स्थायी समिती सर्वसाधारण सभेस द्यावयास पाहिजे होती. महानगरपालिका अधिनियमात कर्मचा-यांना शास्ती लादण्यात आल्या नंतर त्यांना स्थायी समितीकडे सर्वसधारण सभेकडे दाद मागण्याचा अधिकार आहे व स्थायी समितीने सर्वसाधारण सभेने घेतलेल्या निर्णयाप्रमाणे त्याची अमलबजावणी करणे आवश्यक आहे असे हायकोर्टाने निर्णय दिलेला आहे असे असतांनाही स्थायी समिती सर्वसाधारण सभेचे ठराव विखंडीत करण्यासाठी शासनास सादर करण्यात येत आहे. हा स्थायी समिती सर्वसाधारण सभेचा अवमान आहे. स्थायी समितीने सर्वसाधारण सभेने घेतलेले निर्णय चुकीचे असेल तर ते कसे चुकीचे आहे ते आम्हाला सांगावे.कंत्राटदाराची चुक असतांनाही त्यांचे विरुण्ध्द कार्यवाही करण्यात येत नाही,त्यांना ब्लॅकलिस्ट मध्ये टाकण्यात येत नाही मात्र कर्मचा-या विरुध्द कार्यवाही करण्यात येत आहे. ज्या चतुर्थश्रेणीतील कर्मचा-यांना सेवेतून कमी करण्यात आले त्यांना पुर्ववत सेवेत रुजू करुन घेण्यात यावे. स्थायी समितीने घेतलेल्या निर्णयाची अमलबजावणी करण्यात यावी. जे ठराव शासनाकडे विखेंडीत करण्यासाठी सादर करण्यत आले त्याचा पुर्नरविचार करण्यात यावा.

**दिपकसिंह रावत** श्री गिल यांनी ज्या सुचना केल्या त्या बरोबर आहेत. तत्कालिन आयुक्तांनी स्थायी समितीची मान्यता न घेता आपले अधिकार सहायक आयुक्तांना दिले होते म्हणून सभागृहात हक्क भंगचा प्रस्ताव मांडण्यात आला होता त्यांवेळी त्यांनी आपली चुक मान्य केली होती. श्री सुरेश कुलकर्णी यांना ठराव ४५१ खाली विखडीत करण्यासाठी तीन वेळेस शासनास प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. महानगरपालिकेतील कर्मचा-यांनावर अन्याय करण्यात येवू नये. श्री सुरेश कुलकर्णी याचेवर कोणत्याही प्रकारचा अन्याय करु नये त्यांना न्याय देण्यात यावा.

**विनय पाटील** अस्थापना विभागाने कर्मचा-यांना शास्ती लादण्यात आल्यानंतर बडतर्फ केल्यानंतर त्यांना कोणाकडे अपिल करण्याचा अधिकार आहे तसेच कर्मचा-यांचे नेमणूकीचे अधिकार कोणाला आहे याबाबत शासनाकडून मार्गदर्शन मागवावे.

**डॉ.करुणा जमदाडे** अस्थापना विभागाचे बरेचसे प्रस्ताव विषय पत्रिकेवर असतांना अस्थापना विभागाचे सहायक आयुक्त श्री संजय जाधव हे आजच्या सभेस का अनुपस्थित आहेत याचा खुलासा करण्यात यावा.

**दिपकसिंह रावत** अस्थासपना विभागाचे सहायक आयुक्त हे आजच्या सभेस जाणून बुजून अनुपस्थित आहे काय

**आयुक्त** महानगरपालिका अधिनियमातील तरतूदीनुसारा शास्ती लादण्यत आल्यानंतर संबंधित कर्मचा-यांना कोण्ज्ञत्याही प्राधिकरणाकडे अपिल करण्याचे अधिकार आहे याबाबत कायदेशिर मार्गदर्शन मागविण्यात येईल. महानगरपालिकेतील कोणत्याही अधिका-यावर कर्मचा-यांवर अन्याय होणार नाही, जे ठराव शासनास विखंडीत करण्यासाठी पाठविण्यात आलेले आहेत त्याचा नियमाप्रमाणे पुर्नर विचार करता येईल.

**महापौर** स.सदस्यांनी सुचविल्या प्रमाणे प्रस्तावास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र.१९२** **ठ रा व**

कर्मचा-यांच्या अस्थापना विषयी बाबी बाबत मा.आयुक्त यांच्या वतीने मा.उच्च न्यायालय खंडपिठ औरंगाबाद येथे म.न.पा. अधिनियमातील कलम ५६(४) च्या नुसार स्थायी समिती /सर्वसाधारण सभा अपिलीय प्राधिकारी आहेत,असे विविध कर्मचा-याच्या न्याय प्रविष्ट प्रकरणात प्रतिज्ञापत्र देण्यात आले व तसे महानगरपालिकेच्या कायदेसल्लागार मार्फत मा.उच्च न्यायालयाचे निर्देशनास आणुन देण्यात आले आहे.महानगरपालिका स्थायीसमितीने अधिनियमातील प्राप्त अधिकारानूसार कर्मचा-यांच्या अस्थापना विषयक बाबीमधे अपिलात नियमानुसार ठरावाव्दारे निर्णय दिल्यानंतर अपिल प्राधिका-यांच्या दिलेला आदेश ताबडतोब अमलात येईल व तो निर्णायक असेल अशी अधिनियमात तरतुद असतानां प्रशासनातर्फे अधिनियमातील कलम ४५१ नुसार अपिलीय प्राधिकारी म्हणून घेतलेला ठराव प्रशासनातर्फे शासनाकडे विखंडीत करण्यासाठी पाठविण्यात आले आहेत व येत आहेत.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५१ मध्ये कर्मचा-यांच्या अस्थापना विषयक बाबी बाबत स्थायी समिती/सर्वसाधारण सभा अपिलीय प्राधिकारी म्हणून नियमानुसार संमत केलेला ठराव विखंडीत करण्याची तरतूद नसल्यामूळे यापुर्वी स्थायी समितीने/ सर्वसाधारण सभेने कर्मचा-यांना शास्ती माफ करण्यासंबंधी वा शास्तीत सुधारणा करण्याच्या संदर्भात जे ठराव पारीत केले त्याची नियमाप्रमाणे आयुक्तांनी अमलबजावणी करावी व जे ठराव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५१ खाली शासनास सादर केलेले आहेत याचा पुर्नर विचार करावा असे ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सवानुमते संमत करते . व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्र.१७** **प्रस्ताव**

नांवामनपा हध्दीतील शक्तीनगर भागातील पाण्याच्या टाकीखाली बांधकाम करुन विद्यार्थ्यासाठी अभ्यासिका व नागरीकांसाठी वाचनालय चालू करण्यास ही सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते.

**सुचकः-** सौ.संगिता पृथ्वीराज राओत्रे **अनुमोदकः-** रावत दिपकसिंह काशिनाथसिंह

**प्रशासकीय अभिप्राय**

नांवामनपाके मार्फत शहरात तिन ठिकाणी वजिराबाद,स्टेडियम परिसर ,उमर कॉलनी, येथे अभ्यासिका चालविल्या जात आहेत,ग्रंथालय विभागामध्सये सध्या कर्मचारी वर्ग अपुरा आहे.

उपरोक्त ठिकाणी अभ्यासिका व वाचनालय सुरु करण्यासाठी आवश्यक कर्मचारी वर्ग उपलब्ध्द झाल्यानंतर विद्यार्थ्यासाठी अभ्यासिका व नागरीकांसाठी वाचनालय सुरु करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

**महापौर** स.सदस्यांचा पस्ताव मंजुर करण्यात येतो नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी

**ठराव क्र.१९३** **ठ रा व**

नांवामनपा हध्दीतील शक्तीनगर भागातील पाण्याच्या टाकीखाली बांधकाम करुन आवश्यक कर्मचारी वर्ग उपलब्ध्द झाल्यानंतर विद्यार्थ्यासाठी अभ्यासिका व नागरीकांसाठी वाचनालय सुरु करण्यास ही सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**नगरसचिव** विषय क्र.१८ वर विषय क्र.१२ बरोबर निर्णय घेण्यात आलेला आहे.

**विषय क्र.१९** **प्रस्ताव**

भारत देशातील स्वातंत्र सैनिक,समाज सुधारक/समाज सेवक व इतर क्षेत्रात अतुलनिय कार्य करणा-या अनेक महान व्यक्तीचे जयंती व पुण्यतिथी निमित्य नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या वतीने विविध सांस्कृतिक कार्यक्रम ,व्याख्यानमाला व इतर कार्यक्रमाचे दरवर्षी आयोजन करण्यात येत असते याच धर्तीवर महाराष्ट राज्याची स्थापना करणारे श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्य त्यांचे जयंतीचे तारखेपासून ३० दिवसाचे आंत दरवर्षी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या वतीने विविध सांस्कृतिक कार्यक्रम ,व्याख्यानमाला व इतर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावे व त्यासासाठी लागणा-या खर्चाची रु.३.०० लक्षाची तरतूद दरवर्षी अंदाजपत्रकात ठेवण्यास मान्यता देणे बाबत.

**सुचकः-** आनंद शंकरराव चव्हाण **अनुमोदकः-** विनय पाटील गिरडे

**प्रशासकीय अभिप्राय**

मुं.प्रा.मनपा. अधिनियम १९४९ चे कलम ६६ (२१), (२२), (२५), (२६) व (४१) मधील तरतुदीनुसार सांस्कृतीक कार्यक्रम/क्रिडा /महिला व बालकल्याण व विविध संस्थांना देण्यात येणा-या अनुदानासाठी तयार केलेल्या नियमावलीतील मुद्या क्रं. २ जयंती व पुण्यतिथी इत्यादीबाबत नियमावली प्रमाणे शासकीय कार्यक्रमानुसार जेवढया थोर राजकीय व सामाजिक महापुरुषांच्या जयंत्या व पुण्यतिथ्या व त्यानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन असेल त्याच केवळ नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका करेल.

शासनाने वेळोवेळी निर्देश दिलेल्या महापुरुषांच्या जयंती व पुण्यतिथी मनपाकेच्या सर्वसासधारण सभेच्या सभागृहात साज-या करण्यात येतील मनपाकेची परंपरा व शासन निर्देशा व्यतिरिक्त इतर कोणतीही जयंती व पुण्यतिथी साजरी करण्यात येणार नाही असे नमुद आहे.

उपरोक्त बाब लक्षात शासनाने वेळोवेळी निर्गमीत केलेल्या परिपत्रकानुसार प्रतिवर्षी श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती १९ फेब्रुवारी रोजी मनपाके तर्फ साजरी करण्यात येते.तथापि शिवजयंती निमित्त मनपाकेतर्फे कोणतेही सांस्कृतिक कार्यक्रम व्याख्यानमाला व इतर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत नाही.

उक्त नियमावलीतील तरतुदीनुसार व शासन परिपत्रकात नमुद केल्याप्रमाणे प्रतिवर्षी १९ फेब्रुवारी रोजी श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त सांस्कृतिक कार्यक्रम, व्याख्यानमाला व इतर कार्यक्रमाचे आयोजन करणे हा धोरणात्मक निर्णय असून कार्यक्रमाची रुपरेषा ठरविण्यासाठी समिती गठीत करणे लागणा-या खर्चास प्रशासकीय व आर्थीक मान्यता देणे यासाठी प्रस्ताव मनपा सर्व साधारण सभेच्या निर्णयास्तव सादर.

**महापौर** स.सदस्यांचा पस्ताव मंजुर करण्यात येतो नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र.१९४** **ठ रा व**

भारत देशातील स्वातंत्र सैनिक,समाज सुधारक/समाज सेवक व इतर क्षेत्रात अतुलनिय कार्य करणा-या अनेक महान व्यक्तीचे जयंती व पुण्यतिथी निमित्य नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या वतीने विविध सांस्कृतिक कार्यक्रम ,व्याख्यानमाला व इतर कार्यक्रमाचे दरवर्षी आयोजन करण्यात येत असते याच धर्तीवर महाराष्ट राज्याची स्थापना करणारे श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्य त्यांचे जयंतीचे तारखेपासून ३० दिवसाचे आंत दरवर्षी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या वतीने विविध सांस्कृतिक कार्यक्रम ,व्याख्यानमाला व इतर कार्यक्रमाचे आयोजन करण्यास यावे व त्यासासाठी लागणा-या खर्चाची रु.३.०० लक्षाची तरतूद दरवर्षी अंदाजपत्रकात ठेवण्यास ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते. व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्र. २०** **प्रस्ताव**

प्रभाग क्र.१६ नई आबादी आंबेडकरनगरच्या अंतर्गत नांवामनपाकेची जागा उपलब्द आहे. तसेच या विभागात अंगणवाडी केंद्र हे भाडयाच्या घरात आहेत. लाभार्थ्यांना अंगणवाडी केंद्रास स्वतत्र इमारत नसल्यामूळे अंगणवाडीतील लाभार्थ्यांना सोई सुविधा पुरविण्यात अडचणी निर्माण होत आहे. म्हणून कार्यालयाने अंगणवाडीची इमारत बांधण्यासाठी यापुर्वीची जागेची मागणी केली होती परंतु महानगरपालिकेने काहीही कार्यवाही केलेली नाही. अंगणवाडीच्या इमारती बाधकामासाठी शहरी भागात किमान २५० ते ५०० चो.मि. जागा शासनाने निर्धारीत केलेली आहे.

तरी नावामनपा हदीतील अंगणवाडी केंद्र बांधकामासाठी जागा उपलब्द करुन देण्याकरीता हि सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**सुचकः**- रजियाबेगम अयुब खान **अनुमोदकः**- डॉ.करुणा जमदाडे, रजियाबेगम अयुब खान

**महापौर** स.सदस्यांचा पस्ताव मंजुर करण्यात येतो नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**ठराव क्र. १९५** **ठ रा व**

प्रभाग क्र.१६ नई आबादी आंबेडकरनगरच्या अंतर्गत नांवामनपाकेची जागा उपलब्द आहे. तसेच या विभागात अंगणवाडी केंद्र हे भाडयाच्या घरात आहेत. लाभार्थ्यांना अंगणवाडी केंद्रास स्वतत्र इमारत नसल्यामूळे अंगणवाडीतील लाभार्थ्यांना सोई सुविधा पुरविण्यात अडचणी निर्माण होत आहे. म्हणून कार्यालयाने अंगणवाडीची इमारत बांधण्यासाठी यापुर्वीची जागेची मागणी केली होती
परंतु महानगरपालिकेने काहीही कार्यवाही केलेली नाही. अंगणवाडीच्या इमारती बाधकामासाठी शहरी भागात किमान २५० ते ५०० चो.मि. जागा शासनाने निर्धारीत केलेली आहे.

तरी नावामनपा हदीतील अंगणवाडी केंद्र बांधकामासाठी जेथे जेथे महानगरपाजिलकेच्या खुल्या जागा त्या जागा उपलब्ध्द करुन देण्याकरीता हि सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते.नियामानुसार आयुक्तांनी पुढील वेधानिक कार्यवाही करावी . व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्र.२१** **प्रस्ताव**

नांवामनपा ह्ध्दीत विष्णुनगर मध्ये मनपा प्रशासनाकडून दलित वस्ती सर्वे झाला असून प्रभागात ८०.७२ टक्के दलित वस्ती असल्याचे आढळून आलेले आहे. करीता प्रभाग क्र.१४ मधील दलित वस्त्यात विविध सार्वनिक विकास कामांना प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे बाबत.

**सुचकः**- उमरेकर अशोक रावणराव **अनुमोदकः**- सौ.संगिता पृथ्वीराज राओत्रे

**महापौर** स.सदस्यांचा प्रस्ताव मंजुर करण्यात येतो . व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र.१९६** **ठ रा व**

नांवामनपा ह्ध्दीत विष्णुनगर मध्ये मनपा प्रशासनाकडून दलित वस्ती सर्वे झाला असून प्रभागात ८०.७२ टक्के दलित वस्ती असल्याचे आढळून आलेले आहे. करीता प्रभाग क्र.१४ मधील दलित वस्त्यात विविध सार्वजनिक विकास कामांना प्रशासकीय व आर्थिक मान्यता ही नांवामनपा सर्वसाधारणसभा सर्वानुमते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्र. २२** **प्रस्ताव**

नांवामनपा हदीतील प्रभाग क्र. २३ मध्ये लोहर गल्ली भागात राजुरादेवी मदिर समोरील चौरस्त्यास चेतक चौक असे नावं देण्यास ही सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते.

**सुचकः**- सौ.संगिता पृथ्वीराज राओत्रे **अनुमोदकः**- रावत दिपकसिंह काशिनाथसिंह

**उमेशसिंह चव्हाण** याच प्रस्तावा बरोबर शिवाजीनगर ओव्हर जवळील वाडीया फॅक्ट्रीच्या जागेवर जी लोकवस्ती झालेली आहे त्या लोकवस्तीस राजा बन्सीलाल नगर असे नाव देण्यास मान्यता देण्यात यावी.कारण राजा बन्सीलाल जैन हे शहरातील खुप मोठे प्रतिष्ठीत,समाजसेवक व सामाजिक कार्यकर्ते होते.

**विनय गुर्रम** श्री उमेश चव्हाण यांनी जो प्रस्ताव ठेवलात्यास माझे अनुमोदन आहे.

**सरजितसिघ गिल.** चिखलवाडी कॉर्नर निलगगन हॉटेल समोरील चौकास स्वातंत्र सेनानी कै.स.लालसिंघ गाडीवाले चौक महाराणा रणजितसिंघ चौक ते गुरुगोविदंसिघजी प्राथमिक शाळा पर्यतच्या रस्त्यास स. हरिसिंघजी महाजन मार्ग, व कलगीधर शाळेजवळील चौकास शहिर बाबा भूजगसिंघजी चौक असे नावं देण्यास मान्यता देण्यात यावी.

**गुरुमितसिंघ नवाब** श्री सरजितसिंध गिल यांनी मांडलेल्या प्रस्तावास माझे अनुमोदन आहे.

**महापौर** श्री सरजितसिंघ गिल व उमेशसिंह चव्हाण यांनी मांडलेल्या प्रस्तावासह मान्यता देण्यात येते.व हा ठराव याच सभेत कायम करण्यास मान्यता देण्यात येते.

**ठराव क्र.१९७** **ठ रा व**

नांवामनपा हदीतील प्रभाग क्र. २३ मध्ये लोहर गल्ली भागात राजुरादेवी मदिर समोरील चौरस्त्यास चेतक चौक,तसेच चिखलवाडी कॉर्नर निलगगन हॉटेल समोरील चौकास स्वातंत्र सेनानी कै.स.लालसिंघ गाडीवाले चौक तसेच महाराणा रणजितसिंघ चौक ते गुरुगोविदंसिघजी प्राथमिक शाळा पर्यतच्या रस्त्यास स. हरिसिंघजी महाजन मार्ग, व कलगीधर शाळेजवळील चौकास शहिर बाबा भूजगसिंघजी चौक असे नावं देण्यास ही सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते.तसेच वाडीया फॅक्ट्री च्या जागेत झालेल्या लोकवस्तीस राजा बन्सीलाल जैन नगर असे नामकरण करण्यासही ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानमते मान्यता देते.व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्र.२३** **प्रस्ताव**

मालटेकडी रेल्वे गोडावून येथून मालवाहतुक करणारी जडवाहने गोडावून पासून माल धेवून रस्ता क्र.२४ चा वापर करीत आहेत. सदर जड वाहने रस्ता क्र.२४ ओलाडून हैद्राबाद महामार्गाचा वापर करुन वाजेगांवकडे जात आहेत. विशेष म्हणजे हैद्राबाद मार्गावरुन सकाळी ९ ते रात्री ९ पर्यत जड वाहने येण्या जाण्यासाठी बंदी आहे. तरी सुध्दा ही जड वाहने याच रस्त्याने माल वाहतुक करीत आहेत. ज्यामूळे अनेक अपघात घडत आहेत. तरी सदर जड वाहने मालटेकडी गोडावून येथून रस्ता क्र.२४ वर येण्यास बंदी घालण्याकरीता गोडावून येथून रस्ताक्र.२४ ला जोडणा-या रस्त्याच्या टोकावर म्हणजेच रस्ता क्र.२४ व गोडावून येथून येणा-या रस्त्याच्या जंक्शनवर जड वाहने येता येवू नये म्हणून गर्डर बॅरागेट टाकण्यासाठी ही सभा सर्वानुमते मंजुरी देते व हा ठराव यास सभेत कायम करण्यात येतो.

**सुचकः-** स. शेर अली **अनुमोदकः-** बिपाशा बेगम स.वलीओध्दीन

**महापौर** स.सदस्यांचा पस्ताव मंजुर करण्यात येतो नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी

**ठराव क्र.१९८** **ठ रा व**

मालटेकडी रेल्वे गोडावून येथून मालवाहतुक करणारी जडवाहने गोडावून पासून माल धेवून रस्ता क्र.२४ चा वापर करीत आहेत. सदर जड वाहने रस्ता क्र.२४ ओलाडून हैद्राबाद महामार्गाचा वापर करुन वाजेगांवकडे जात आहेत. विशेष म्हणजे हैद्राबाद मार्गावरुन सकाळी ९ ते रात्री ९ पर्यत जड वाहने येण्या जाण्यासाठी बंदी आहे. तरी सुध्दा ही जड वाहने याच रस्त्याने माल वाहतुक करीत आहेत. ज्यामूळे अनेक अपघात घडत आहेत. तरी सदर जड वाहने मालटेकडी गोडावून येथून रस्ता क्र.२४ वर येण्यास बंदी घालण्याकरीता गोडावून येथून रस्ताक्र.२४ ला जोडणा-या रस्त्याच्या टोकावर म्हणजेच रस्ता क्र.२४ व गोडावून येथून येणा-या रस्त्याच्या जंक्शनवर जड वाहने येता येवू नये म्हणून गर्डर बॅरागेट टाकण्यासाठी ही सभा सर्वानुमते मंजुरी देते व हा ठराव यास सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्र.२४** **प्रस्ताव**

नांदेड शहरात सर्वत्र तीवृ स्वरुपाची पाणी टंचाई असून महानगरपालिकेतर्फे दोन दिवसाआड पाणी पुरवठा केला जात आहे. काही ठिकाणी कमी दाबाने व अनियमित पाणी पुरवठा होत असल्यामूळे नागरीकांना मुंबलक प्रमाणात पाणी पुरवठा होत नाही. नागरीकांना मुलभूत सोई सुविधा पुरविणे महानगरपालिकेचे आद्य कर्तव्य आहे.त्यामूळे नावामनपा हदीत प्रत्येक भागामध्ये पाच पाच बोअर मारुन त्यावर सबमर्सिबल पंप बसवून नागरीकांना मुबलक प्रमाणात पाणी पुरवठा करण्याकरीदता हि सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करते

**सुचकः-** नवल पोकर्णा **अनुमोदकः-** इशरत फातेमा अ.शमीम

**नवल पोकर्णा** आमच्या प्रभागात मागील २० वर्षापासून पाण्याची समस्या आहेत. पुरेशा दाबाने पाणी पुरवठा होत नाही. अशीच परिस्थिती इतर प्रभागाची आहे. जर प्रत्येक वार्डात ५-५ विधंन विहिरी घेंतल्यानंतर नागरीकांना त्याचा फायदा होवू शकतो. तरी प्रस्तावास मान्यता देवून त्याची अमलबजावणी तात्काळ करण्यात यावी.

**गफार खान** अस्तित्वात असलेले बोअर वेलचे हातपम्प त्वरीत दुरुस्ती करणे आवश्यक आहे. तसेच काही विंधुन विहिरीवर विद्युत पंप बसविण्यात आले परंतु विद्युत देयके न भरल्यामूळे विद्युत कनेक्शन तोडण्यात आलेले आहे. विद्युत देयके भरुन विद्युत पम्प चालू करण्यात यावे जेणे करुन ब-याचश्या भागातील पाण्याचा प्रश्न सुट्र शकेल.

**विनय गुर्रम** माझ्या प्रभागात दिड वर्षापासुन पाण्याचे टाकीचे बांधकाम करण्यात आले परंतु नागरीकांना पाणी पुरवठा होत नाही. याबाबत मी वारंवार पाणी पुरवठा विभागाचे उपअभियंत्याकडे तक्रार केलेली आहे परंतु अद्याप पुर्तता झालेली नाही.उपअभियंत्याना काही तांत्रिक ज्ञान आहे किंवा नाही.आयुक्तांना विनंती आहे ज्या अभियंत्याना पाणी पुरवठयाचे तांत्रिक ज्ञान आहे त्यांना पाणी पुरवठा विभागात देण्यात यावे. पाणी पुरवठा

विभागाचा अतिरिक्त पदभार श्री सुग्रीव अंधारे यांच्याकडे देण्यात यावा जेणे करुन माझ्या वार्डातील पाण्याचा प्रश्न सुटू शकेल.

**डॉ.करुणा जमदाडे** आर्थिक दृष्टया दुर्बल धटकातील व मागासर्गीय नागरीकांना रु.५००/- भरुन नविन कनेक्शन देण्याचा निर्णय धेण्यात आलेला असतांनाही आमच्या प्रभागातील नागरीकाकडून नळ कनेक्शनसाठी रु.१०००/- घेवून नळ कनेक्शन देण्यात येत आहे .

**फारुख अली खॉ** मागील अडीच वर्षापासुन स. सदस्य आपल्या प्रभागातील विकास कामाचे प्रस्ताव सर्व साधारण सभेत मांडतात सर्व स.सदस्य या प्रस्तावाना पास पास म्हणून मान्यता देतात नापास कोणतेच ठराव होत नाही परंतु पारीत करण्यात आलेल्या ठरावाचे पुढे काय होते त्याचा रिझल्ट काहीच नाही.आम्ही पारीत केलेल्या ठरावाची अमलबजावणी होते किंवा नाही

**महापौर** स.सदस्यांचा पस्ताव मंजुर करण्यात येतो नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिककार्यवाही करावी

**ठराव क्र.१९९** **ठ रा व**

नांदेड शहरात सर्वत्र तीवृ स्वरुपाची पाणी टंचाई असून महानगरपालिकेतर्फे दोन दिवसाआड पाणी पुरवठा केला जात आहे. काही ठिकाणी कमी दाबाने व अनियमित पाणी पुरवठा होत असल्यामूळे नागरीकांना मुंबलक प्रमाणात पाणी पुरवठा होत नाही. नागरीकांना मुलभूत सोई सुविधा पुरविणे महानगरपालिकेचे आद्य कर्तव्य आहे.त्यामूळे नावामनपा हदीत प्रत्येक भागामध्ये पाच पाच बोअर मारुन त्यावर सबमर्सिबल पंप बसवून नागरीकांना मुबलक प्रमाणात पाणी पुरवठा करण्याकरीता लागणा-या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता हि सर्वसाधारण सभा सर्वानुमते देते ,व हा ठराव याच सभेत कायम करते.

**महापौर** सभेचे कामकाज नियमानुसार सभेचे कामकाज सायं.७.०० पर्यतच करण्याची तरतूद असल्यामूळे उर्वरीत विषया करीता आजची सभा ३१.३.२०१५ पर्यत तहकुब करण्यात येते.
शेवटी राष्ट्रगित म्हणण्यात आले.

| | |
|---|---|
| **स्वाक्षरीत/-** | **स्वाक्षरीत/-** |
| **नगरसचिव,** | **महापौर,** |
| नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड. | नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड |